SNUK
Where tireless striving stretches its arms towards perfection

## सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

# शब्दसुधा

वार्षिकांक २०२१-२२


Sudhakarrao Naik Arts, Science and Umashankar Khetan Commerce College, Akola
Note cam lite
Latitude : 20.684145°
Longitude : 77.0280322°


मतदान जनजा


Naik Arts, Science and Umashankar Khetan Commerce College, Akola




Sudhakarrao Naik Arts, Science and Umashankar Khetan Commerce College, Akola
Note cam lite
Latitude : 20.68430025°
Longitude : 77.02793906°
Altitude : 239.87952 meters
Date : 01/28/2022 11:45




urp-yqdq-mrk
Ramesh
11 others









# शब्दसुधा

■ आमचे प्रेरणास्थान ■

मा.बी.पी.पवार

संस्थापक सचिव : सु. ना. कला, विज्ञान व उ. खे. वाणिज्य महाविद्यालय,अकोला.

■ मार्गदर्शक ■

डॉ.जयंत बोबडे

प्राचार्य

■ संपादक ■

प्रा.डॉ.भास्कर पाटील, प्रा.नेमीचंद चव्हाण

■ सह संपादक ■

प्रा.डॉ.गजेंद्र वासनिक, प्रा.डॉ.नितीन देऊळकार

■ संपादक मंडळ ■

गजानन ताथोड, कु.प्रेरणा डहाणे

हर्षल खडे, कु.मयुरी भस्कट

: प्रकाशक :

प्राचार्य डॉ.जयंत बोबडे

मुखपृष्ठ : विजय गजभिये (माजी विद्यार्थी)

मुद्रक : योगिनी प्रिंट्स,मलकापूर,अकोला

(या अंकामध्ये प्रसिध्द झालेले लेखन हे त्या-त्या लेखकाचे, कवीचे असून संपादक मंडळ या लेखनास सहमत असेलच असे नाही. )

# संपादकीय...

प्रिय रसिक वाचक मित्रांनो,

आपल्या महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना विद्यार्थ्यांनी आपल्या अंतःकरणात दडलेल्या सुप्त गुणांना शब्दसुधाच्या माध्यमातून आविष्कृत केले आहे. शब्दसुधाचे संपादक या नात्याने आम्हाला खेद वाटतो की, दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचे वाचन आणि लेखन कौशल्याचे विस्मरण होत आहे,तरी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या वर्षीच्या अंकामध्ये जे साहित्य लेखन केले आहे ते उत्कृष्ठच आहे.

वाचन प्रेमी बंधुजनहो .... मागील काळ हा आपण सर्वांसाठी वेदनादायी होता. कोरानाच्या प्रभाव परिणामाने आपण सगळेच अत्यवस्त झालो, त्याचे परिणाम सामाजिक क्षेत्रासह शैक्षणिक क्षेत्रावरही पडलेत. हळूहळू आपण त्यातून अलिकडे आपण सावरत आहो. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती व मनपटलावर याचे दूरगामी परिणाम झाल्याचा प्रत्यय आज येतोय. यावर मात करुन विद्यार्थी हा वाचनप्रिय, लेखन प्रिय बनावा ही अपेक्षा आहे.

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना उत्तम गुणांची पदवी प्राप्त करणे हे प्रत्येक विद्यार्थ्यांचे ध्येय असायला हवे. त्यासोबतच कला, क्रीडा, साहित्य लेखन, ह्या क्षेत्रातील ज्ञान, आनंद मिळविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. व्यक्तिमत्त्व विकासासाठी हे सर्व आवश्यक आहे. पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर सामाजिक जीवनात वावरतांना महाविद्यालयातील हा सर्वकश अनुभवच तुम्हाला एखादया दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणार आहे.

'शब्दसुधा' हा वार्षिकांक सुंदर आणि आकर्षक करण्यासाठी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव, मा. प्राचार्य, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संपादक मंडळातील सदस्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या उत्स्फूर्त व सक्रिय सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. या अंकात समाविष्ट सर्व कवी-लेखक व संकलक यांचे सहर्ष अभिनंदन. हा अंक प्रसिध्द करण्यासाठी संपादक मंडळावर प्राचार्यांनी जो विश्वास दाखविला, स्वातंत्र्य दिले, त्यामुळेच अंक अधिक सुबक करण्यास संपादकांना आनंद वाटला. त्यासाठी महाविद्यालयाचे संस्थेचे संपादक मंडळाकडून आभार.

या अंकास अधिक आकर्षक करण्यासाठी हेमंत आडे व मुक्ता वाघमारे यांनी छायाचित्र सजावट करुन दिली. तसेच योगीनी प्रिंट्सचे श्री .गजानन वाघमारे यांनी अंक सुबक व दर्जेदार करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आभार व या अंकातील त्रुटीबद्दल क्षमस्व !



- संपादक मंडळ

# ...शुभेच्छा संदेश...

शामकीमाता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ,उमरी ( बु.) जि. वाशिम व्दारा संचालित असलेल्या अकोला स्थित सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' शीर्षकाचा वार्षिकांक ( २०२१-२२ ) प्रकाशित होत असल्यामुळे मला शुभेच्छा देतांना फार आनंद होत आहे. प्राचार्य आणि संपादक मंडळाने महाविद्यालयीन तरुणांना आपले हक्काचे विचारपीठ 'शब्दसुधा'च्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्याबद्दल अभिनंदन......

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना लिहिते करण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती या संपादकीय मंडळाने स्वीकारली. त्या माध्यमातून त्यांचे विचार, भाव-भावना व्यक्त करण्याची ही मोठी उपलब्धी या माध्यमाने यशस्वी होत आहे. या अंकामध्ये समाविष्ठ झालेले लेखन चांगल्या प्रकारचे आहेच. तरीही मला असे वाटते की, पुढील अंकामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये घडलेले सुखद किंवा दुःखद अनुभव शब्दबध्द करावेत. सोबतच बोलीभाषेतील म्हणी-वाक्प्रचार सुभाषिते, लोकगीते, महापुरुषांचे प्रेरणादायी विचार यांचे संकलन -आकलन करुन विद्यार्थ्यांनी आपली लेखन कौशल्यता वाढवावी. याच हेतूने आम्ही महाविद्यालयात स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध करुन दिली आहे, त्याचा जरुर लाभ घ्यावा.

मला आनंद आहे की या अंकामध्ये मराठी भाषेविषयी म्हणी, वाक्यप्रचार,सुभाषिते यांचा समावेश झाला आहे. विद्यार्थ्यांनी सतत लिहित,वाचत राहिले पाहिजे. हा अंक प्रसिध्द होतांना एक वेदना आहेच, जगभर पसरलेली कोरोनाची महामारी. यामुळे आपली सगळी मानवजात आज भयभीत झाली आहे. लक्षावधींचा बळी घेणारी ही महामारी आपल्या सहस्त्रकांतील कधीही विस्मरणात न जाणारी घटना आहे. यातून सावरणे, दक्षता घेणे ,इथून पुढे येणाऱ्या अनेक समस्यांना आपण तोंड देण्यास सज्ज व्हावेत अशाही सदिच्छा मी सर्व विद्यार्थ्यांना देतोय.

शेवटी जीवन काय आहे, याचा सार व्यक्त करणारा एक संदेश समाजमाध्यमावर फिरला, तो मला खूप भावला, तो आपण सर्वांना संदेशपुरक ठरेल, यासाठी आपल्यापुढे साभार व्यक्त करतो.

## जीवनातील सात सत्य--

आरसा – खोटे बोलू देत नाही,
ज्ञान – घाबरवू देत नाही,
समाधान – मोहपाशामध्ये अडकवत नाही ,
सत्य – कमकुवत होऊ देत नाही,
प्रेम – व्देष करु देणार नाही,
विश्वास – दुःखी होऊ देणार नाही आणि
कर्म – जीवनात अपयशी होऊ देणार नाही (साभार -गुगल प्ले स्टोअर)

या सात सत्याचा स्वीकार करुन आपण आपले जीवन सफल करावे, जे इतरांनाही लाभदायक ठरणारे असेल, या सदिच्छांसह थांबतो.

**श्री. बी. पी. पवार**
( संस्थापक सचिव )
शामकीमाता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ,
उमरी ( बु.) जि.वाशिम

# दोन शब्द : प्राचार्यांचे
# अभिनंदन ....आणि शुभेच्छाही



२०२१-२२ या वर्षीचा आमच्या महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक प्रकाशित होत असतांना मला अत्यंत आनंद होत आहे. विद्यार्थ्यांना आपल्या मनातील विचार ,त्यांचे सुप्त गुण यांचा विकास करण्यासाठी वार्षिकांक महत्वाचा दस्तऐवज असतो. यामुळे विद्यार्थ्यांना लिखाणाची आवड निर्माण होण्यास मदत हाते. महाविद्यालयाने 'शब्दसुधा' हा वार्षिकांक दरवर्षी प्रकाशित करुन विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असतो. विद्यार्थ्यांची प्रगती म्हणजे महाविद्यालयाची प्रगती असते, म्हणून त्यांचा व्यक्तिगत विकास व्हावा या करिता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग व विविध अभ्यास मंडळांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. मागील दोन शैक्षणिक सत्र कोवीड -१९ मुळे प्रभावित असल्याने महाविद्यालयाला देखील अनेक समस्यांना सामोरे जावे लागले.याही स्थितीत महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रस्थान मानुन विविध कार्यक्रम राबविले. या एकूणच कृतीचा लेखाजोखा सुध्दा या वार्षिकांकातून विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात येतो. याचा उद्देश हाच की यातून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच त्यांचे विचार शब्दबध्द करण्याचे कार्य हा 'शब्दसुधा' अंक निश्चितच करीत आहे. विद्यार्थ्यांच्या कथा, कविता, चारोळी , विनोद, विविध लेख या अंकातून प्रसिध्द करुन त्यांना हक्काचे विचारपीठ आमच्या 'शब्दसुधा' वार्षिकांच्या संपादक मंडळाने उपलब्ध करुन दिलेले आहे. संपादक मंडळाने अतिशय मेहनतीने अतिशय आकर्षक आणि वाचनीय अंक संपादित करुन दिला, त्याबद्दल या अंकाचे संपादक डॉ.भास्कर पाटील, प्रा.नेमीचंद चव्हाण वार्षिकांक समिती सदस्य डॉ.गजेंद्र वासनिक , डॉ. नितीन देउळकार या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो आणि या अंकाच्या पुढील वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा देतो.


प्राचार्य

डॉ.जयंत बोबडे

सु. ना. कला, विज्ञान व उ.खे.

वाणिज्य महाविद्यालय,अकोला.

# बंजारा लोकगीते : एक अभ्यास

भारतीय प्राचीन इतिहासात १२५० मध्ये गोर आणि गोरविती महाऋषी होऊन गेले, पाठांतर करणे बंजाराची विशेषता आहे. ते म्हणतात **लको जकोण मिट जाव हारद कर जो हारद रैजोव** म्हणजे लिहिलेले मिटू शकते पण मुखोद्गत केलेले पिढी दर पिढी जिवीत राहते. गोर बंजाराचा इतिहास लिखीत रुपात नाही, परंतु मौखित रुपात आजही लोकगींत म्हणी, कथा, लेगी, केळावंट इत्यादीमध्ये जिवंत आहे. लोकसाहित्यामध्ये बंजारा लोकगीतांची परंपरा प्राचीन काळापासून पहायला मिळते. लोकगीतांची शब्दसंपदा, भाषा सोबत त्यांचे अस्तित्व कायम आहे. त्यामुळेच बंजारा लोकगीताचा प्रवाह आजपर्यंत चालत आला आहे. यामध्ये घटीपरेर गीत, तिजेर गीत, होळीर गीत, दवाळेर गीत, देवीदेवाते गीत, वायार गीत, इत्यादी पूर्वजांच्या विरासतमध्ये मिळाले आहे. तिचा प्राचीन इतिहास, त्याच्या रहण सहन, खान-पान, देवी-देवता, पुजा-अर्चा, जश्न-त्योहार मध्ये लपलेला आहे. बंजारा, त्यांची संस्कृती, धार्मिक, प्रथा, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजनितीक शासन भौगोलिक प्रसार आणि बंजारा चा इतिहास प्राचीन सिंधु संस्कृतीत दफन केल्या गेला, इतिहासातील दंत कथा आणि कहानी लोकगीतातून बंजाराच्या इतिहासाचे दर्शन घडते **आन धन देस मारे नायक बापुरी नगरी हवेली खाये पियसी नगरी** येथे नगरीचा अर्थ आहे हडप्पा नगरी आहे. बंजारा समाजात स्त्रियांना हरपळी म्हणतात.

हरपलीचा बंजारा बोलीत गोरबालीत अर्थ आहे. हडप्पा येथे राहणारी, **मारी हरपळी याडी, मारी हरपळी बाई, मारी हरपळ नायकण** याचा असा अर्थ आहे, की माझी हडप्पा येथे राहणारी आई, माझी हडप्पा येथे राहणारी बाई, माझी हडप्पा येथे राहणारी नायकण बंजारा समाजातील होळी उत्सवातील लेंगी या लोकगीत प्रकारातून सुध्दा गोर बंजारे हडप्पा व मोहनजादारो येथिल रहिवाशी असल्याचे स्पष्ट होते. " वड फंदु मारे मोहनारो देस वड फुंदी मारे मोहनारो देस मारे मोहणारी खबर लिया फुंदी फुंदी वड वड जो वड फुंदी मारे हडप्परो देस वड फुंदी मारे हडप्पा देस मारे हडपरी खबर लिया फुंदी फुंदी वड वड जो मारे नायकेरी

हे फुलपाखरा तु उड माझ्या
मोहना नगरीत जा आणि माझ्या
मोहनगरीची खबर घेऊन ये माझ्या नायक
बापुची खबर घेऊन ये हे फुलपाखरा
माझ्या हडप्पा नगरीत जा आणी माझ्या
हडप्पा नगरीचे खबर घेऊन ये माझ्या
नायक बापुची खबर घेऊन ये

### लदेणी आणि बार्टर पध्दतीच व्यापार सिंधु संस्कृतीत :-

बंजरा मुळ घाटी संस्कृती असावी कारण ते लदेणी आणि बार्टर पध्दत्तीने व्यापार बैल, उंट, घोडे इत्यादी च्या साहय्याने वैदिक काळापासुन करत असत. सर मार्शल यांनी इडस सिव्हीलायझेशन पुस्तक लिहिले गोर संस्कृत्तीचा इतिहास सिंधु घाटीत दडलेला असल्याचे सांगितले.उत्खननात मोहनजोदारो येथे सापडलेले ३१-२३-८ फिट चे तलाव आंघोळीसाठी नसुन गोर चे लदेणी केलेल्या बैलाला पाणी पिण्यासाठी वापरले जाते पाय-या समांतर असल्याने त्यांनी पाणी पिण्यास सोपे जात बैलाच्या पाठीवरील लदेणी वजनदार असल्याने माल वारंवार उतरविणे, चढविणे कठीण असायचे त्यासाठी अशी व्यवस्था केली होती. या तलावाच्या शेजारी १५० फुट लांब व ७५ फुट रुंद धान्य साठविण्याचे कोठार सापडले आहे. शेजारीच एक गोदी सापडली धान्य साठवणुक वितरण व लदेणी सोपी जावी या दृष्टीने रचना केल्याचे आढळते याचा अर्थ निःसंशय गोरवशीयानी ही तलाव व धान्य साठवणुक बांधले असल्याचे स्पष्ट होते. अशाच प्रकारची तलाव व धान्य साठवणुकीची रचना हडप्पा मध्ये असल्याची सापडली आहे. महययुगीन काळात अशाच प्रकारचे तलाव अफगाणिस्तान, राजस्थान, गुजरात मध्ये बांधले गेले आहेत. त्याना बंजारा वावडी म्हणतात. बंजारा संस्कृतीत ज्यादा तर लोक गाय बैलाचा वापर करत त्या कारणाने बंजारा समाज हा पुर्वी गोर समाज म्हणुन ओळखल्या जात इ.स.१४६९ ते १५२० मध्ये नानकाच्या काळात बंजारा नाव उत्पन्न झाले असेल बंजारा हे मुळ गोरवंशीय आहेत. संपुर्ण देशातील बंजारा आपणास गोर म्हणुन घोषित करतो गोर शब्दाची उत्पत्ती गो म्हणजे गोय आणि र म्हणजे रक्षा गाईची रक्षा करणारे गोर वंशात बंजारात गाईची पुजा अर्चा आजही करतात तांड्यात देवाच्या नावावर एक बैल सोडण्यात येता. त्याला सांड कठाळ्या किंवा गराशा म्हणतात. इ.स.पु.३०० वर्षापासुन आज २१ व्या शतकापर्यंत गोरवंशी गोपालन करतात. गोधन पूजा आजही दिवाळीच्या वेळी लक्ष्मीपुजेच्या रुपात तांड्यामध्ये केला जाते. त्या संबधी लोकगीत

आये हुँ, गाई गोदा पूजये तु
गाई गोधन पुज
खेवाड्या मोवाड्या वांड्या बुच्या
घोडेरी कसारे टोकळीसे मातेर
कुडा भरो घी तलावडी भरो छात्र
आन धन लाव लसकर घण घण
देस दवाळी माता

कुवा-या मुली आशिवर्वाद मागतात
मेरा मागतात तेव्हा कुंवारी मुली म्हणतात.
नववर्षेरी आवगी दवाळी
घरघर वेगी पणवाळी
चांदा सुर्या जंगलेम वजाळो
पडशे आंगळेम
वर्षदनेरी कोट दवाळी याडी तोन मेरा
वर्षदनेरी काट दवाळी बापु तोन मेरा
वर्षदनेरी काट दवाळी मावशी, मावसा,भाऊ,नाना,नानी
दादा,दादी,मामा,मामी,काका,काकी,मोठी आई,मोठे
बाबा, तोन मेरा

मोती चंद्र यांनी सार्थवाह ग्रंथात सिंधु घाटीपासुन ११ व्या शतकापर्यंत भारतीय व्यापाराचा इतिहास लिहिला आहे. सिंधु घाटीपासुन जल स्थल वर जो व्यापार चालत त्या व्यापारी नायकास सार्थवाह म्हणत असत सार्थवाह वर्गाचा प्रमुख गोर बंजार होते रामशरण शर्मा यांच्या प्राचीन अर्थव्यवस्था ग्रंथात मालवाहक बैलाचया संदर्भ येतो सिंधु घाटीपासुन १२ व्या शतकापर्यंत बैलाच्या पाठीवर सामान लाटुन ने आण करण्याचे काम मुख्यतः बंजारे करत बंजारा जवळ मालवाहक तथा ट्रान्सपोर्टसाठी लाखो बैल राहत होते असे संदर्भ सिंधु घाटी सभ्यता ऋग्वेद वैदिक युग बौध्द जातक कथा जैन, मौर्य, गुप्त बावर,अकबर,जहाँगीर,औरगजेब,शिवाजी,महाराज,बाज ीराव पेशवे तथा टिपु सुलातान इग्रज येईलपर्यंत मिळतात.

कु.रोहिणी अमरसिंग राठोड
बी.ए. - भाग ३

## भारतीय संस्कृती

प्रस्तावना :-

संस्कृती या शब्दाचा अर्थ चांगले करणे असा होता धर्मासह समग्र अंतर्बाहय जीवनाचा उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करावयाचे संस्कार.

कला शास्त्रे यातील उच्च अभिरुची -अर्थात अभिजात संस्कृती एखाद्या संस्थेचा / संघटनेच्या किंवा एखाद्या समुहाच्या प्रवृत्ती, मूल्ये, ध्येये, प्रथा, प्रघात इत्यादी सामायिक बाबी मानवी ज्ञान समजुती वर्तणुकी इत्यादीचा एकत्रित परिपाक म्हणजे संस्कृती.

### आशय :-

मनुष्य व त्याच्या भोवतीचे विश्व मिळून निसर्ग बनतो. या निसर्गामध्ये जिवनाच उत्कर्षाला अनुकूल असे बदल करुन म्हणजेच निसर्गावर काही संस्कार करुन मनुष्य आपली जिवनयात्रा चालवितो. तो केवळ बाह्य विश्वातील पदार्थावर संस्कार करतो असे नव्हे, तर स्वतःच्या देह मन आणि बुध्दी यावरही संस्कार करुन स्वतः बदल घडवून आणतो.

### संस्कृतीची रुपे :-

संस्कृतीचे दोन रुपे असतात एक डोळयाला जाणवनारी व दुसरे ज्ञानेंद्रियेव्दारे जागवणारी, याविषयी इरावती कर्वे यांनी नोंदविले आहे.

### वाचन संस्कृती :-

टि.व्ही., रेडीओ, इंटनेट, फेसबूक, व्हॉट्सॲप, व्टिटर यासरख्या आधुनिक प्रसारमाध्यमाच्या उपलब्धतेचा साहित्यव्यवहार आणि वाचन संस्कृतीवर जाणवण्यातपत परिणाम झाल्याचे दिसते. आधुनिक वाचकवर्ग या प्रसारमाध्यमाच्या विळख्यात सापडल्याने वाचन संस्कृतीवर काय चांगले, काय वाईट हे परिणाम बघणे गरजेचे आहे.

हिंदु संस्कृतीचे अन्य विषय

हिंदु संस्कृतीच्या संदर्भात विविध संकल्पना मानल्या आहेत.

१. ऋणुकल्पना :- ही भारतीय समाजशास्त्रीय महत्वाचे संकल्पना असुन व्यवस्थेची या संल्पनेची सांगड घातलेली दिसुन येते.

२. आश्रम :- मानवी आयुष्याचे चार भाग करुन व्यवस्थेची या संकल्पनेची सांगड घातलेली असे नाव दिले आहे. ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणी संन्यास असे हे चार आश्रम आहेत.

३. पुरुषार्थ :- धर्म, जाती, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ मानले असुन नीतीशास्त्राचा दृष्टीने याला विशेष महत्त्व आहे.

४. चातुवर्ण्य :- ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणी शुद्र असे चार वर्ण मानले जाते

५. प्रतिक संकल्पना स्वास्तीक, कमळ, यज्ञ अशी विविध प्रतिके ही भारतीय संस्कृतीचे महत्वाचे घटक आहे.

बाह्य दुवे
संस्कृतीची अंगे
१.भुमी
२.भारतीय जणता
३.भाषा व साहीत्य
ही भारतीय संस्कृतीची तीन अंगे आहेत.
भारतीय संस्कृती कोश खंड नववा

## भातीय संस्कृती कोश :-

भारतीय संस्कृती कोश हा भारताचा संस्कृती बद्दल माहीती देणारा आणि भारतीय संस्कृती कोश मंडळाने प्रकाशीत केलेला दहाखंड कोश आहे. हा कोश महादेव शास्त्री जोशी यांनी संपादीत आहे.

## संस्कृती :-

प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे त्यावर होणारा विकार किंवा बिघाड आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये या उद्देशाने तिच्यावर करायचे विविध सम्ये संस्कार होय.

१. आध्यात्मीक बाह्य विश्वावर संस्कार करुन त्याला मानवाच्या उन्नतीसाठी उपकारक बनविणे हा संस्कृतीच्या अधी भौतीक विभाग होय शेती, पशुपालन, स्थापत्य धातुकाम यत्र निर्मीती, नगर रचना औवधी संशोधन अर्थोत्पादन आणि वितरण या गोष्टी अधिभौतीक या विभागात येतात.

२. अधिदैविक भाग्य :- अनुकूल व्हावे प्रयत्न सफल व्हावे या उद्देशाने देवताची पुजा आणि प्रार्थना करणे पशुपालन स्थापन

३. आध्यात्मीक :- स्वतःच्या मनावर करुन त्यांना आत्मदर्शनाची योग्यता प्राप्त करुन देणे हा संस्कृीचा आध्यत्मिक विभाग होय धर्म तत्वज्ञान नितीनियम, विद्या, कला, शुदूण, शिष्ट्राचार संस्कार ई.स. गोष्टीचा अंतर्भाव संस्कृतीच्या आध्यामीक विभागात होत असतो.

कोशात समाविष्ट विविध विषय
१. यज्ञसंस्था व तिची अंगोपांगे
२. वैदीक, स्मार्त, पौरामीक व अन्य धर्मीय लोक यांचे गृह्य आणि सामाजीक संस्कार
३. गृह नक्षत्र तिथी वार यांच्या योगताते होणारी सर्व प्रकाराची पर्वे
४. प्रांतीय व अखिल भारतीय सण व उत्सव
५. सर्व प्रकारची
६. वर्णाश्रमाधी कर्तव्य व अधिकार
७. अखिल भातीय उपसतेचे विविध प्रकार
८. निसर्ग आणी पशु पक्षी यांच्याशी मानवाचे सांस्कृतीक संबध
९. अवतार व संत व सत्पुरुष यांचे जन्मोत्सव आणि पुण्यतीथी.
१०. पंथ उपपंथाचे तत्वज्ञान
११. सर्व दार्शवाद मतवाद
१२. विविध विद्या व कला
१३. प्रादेशीक भाष व त्याचा विकास
१४. प्रादेशीक भाष व त्याचा विकास लोकसाहीत्य
१५ वेद, वेरांग, उपदेश या साहीत्याचा परिचय
१६. मुतीकला, चित्रकला व त्याच्या शैली
१७. प्रोताप्रातीची लोककला खेळणी वेशभूषा अलंकार इ
१८. संगीत शास्त्रीय व जानपद

## भारतीय संस्कृती

भारतीय संस्कृती ही देशाच्या इतीहासामुळे विलक्षण भुगोलकार मुळे आणि जनतेतील वैविद्यामुळे आकारास आली शेजारच्या देशातील चालीरीती परंपरा व कल्पना सामावुन घेत भारतीय संस्कृतीचे सिंधुसंस्कृती दरम्यान जन्माला आलेल्या तसेच वैदीक काळात दक्षिण भारतातील लोहयुगकाळात बौध्द धर्माच्या उध्दव आणि -हासाच्या काळात तसेच भारताचे सुवर्णयुग मुसलमानी आक्रमण व युरोपीयन देशाच्या वसाहतीदरम्यान झालेला बद्दल पचवुन देखील स्वतःचे परंपरागत प्राचीनत्व टिकवुन ठेवले आहे. भारतीय संस्कृतीचे च्यिा इतीहासाने अध्दीतीय भौगोलीक रचतेने वैविध्यपुर्ण लोकजीवणाचे आणी शेजारील देशाच्या परंपरा व कल्पना स्वीकारुन तसेच पुरातन परंपरा जपवुन अकार घेतला जातो. भारतात जागोजागी वेगवेगळे लोक, धर्म, वातावरण भाषा चालीरीती आणि परंपरा यात बैविध्य दिसत असुनही आढळणारे साम्य हे या देशाचे वैशिष्ट आहे. देशभरात पसरेलल्या विविध उपसंस्कृती आणि हजारो वर्षाच्या परंपरा यांची एकत्रीत वळलेली मोट म्हणजे भारतीय संस्कृती.

## आशय :-

मनुष्य व त्याच्या मोवतीचे विश्व मिळुन निसर्ग बनतो या निसर्गामध्ये जिवनाचा उत्कार्षाला अनुकुल असे बदल करुन मनुष्य आवली जिवणयात्रा चालवितो तो केवळ बाह्य विश्वातील संस्कारावर सरकसक करतो असे नव्हे तर स्वतःचा देह बुध्दी आणी संस्कार करुन बदल घडवुन आणतो संस्कृती या शब्दात हे दोन्ही प्रकारचे अभिप्रेत आहे.

## वैशिष्टये :-

भारतच्या सास्कृतीक इतिहासाची वाटचाल पहीली असता तिच्या प्रमुळ तीन वैशीष्टे दिसुन येते
१. अखडित परंपरा २. राजकीय व धार्मीक सत्ताच्या केंद्रीकरणाचा अभाव ३. संस्कृती संघर्ष टाळुन संस्कृती संगम करण्याची प्रवृत्ती असते भारतीय संस्कृती जपणे हे भारतीय नागरीकाचे कर्तव्य आहे...

कु.शितल भांगे
बि.ए.व्दितीय वर्ष

।।यशस्वी कथा वाचू नका, त्यांनी केवळ संदेश मिळतो.
अपयशाच्या कथा वाचा,
त्याने यशस्वी होण्यासाठी कल्पना मिळतात.।।
- डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम

# मराठी म्हणी व अर्थ

१. अती तेथे माती :- कोणत्याही गोष्टीची अतीरायोवजी केली असता त्याचे अर्थ परिणाम वाईटच होतात.

२. अती शहणा त्याचा बैल रिकामा :- प्रत्येक कामामध्ये फार चिकित्सा करीत बसल्यास कोणतेच काम पुर्ण होत नाही.

३. अती राग भीक माग :- अती संपापामुळे स्वतःचेच नुकसान होते.

४. अडला हरी आणि गाढवाचे पाय धरी :- अडचणीत सापडले असता मुर्ख माणसाची सुध्दा स्तुती करावी लागते.

५. अंग अंग म्हशी मला कुठे नेशी :- आपली फजिती लपाविण्यासाठी काहीतरी बहाणा करणे

६. मिळी गुपचिळी :- आपल्या मनातील हेतुचा दुस-याला सुगावा लागु न देणे

७. अती खाणे मसणात जाणे :- गरजेपेक्षा जास्त खाण्याने आपल्याच तब्येतीवर वाईट परिणाम होतो.

८.अर्ध टकायचे आणि सगळ्यात धावायचे :- मिळालेला गोष्टीचे समाधान न मानता ती सोडुन देऊन जास्त मिळेल या आशेने दुस-या गोष्टीच्या मागे धावणे

९. अथी दान महापुण्य :- योग्य ठिकाणी दान केल्याने फार मोठे पुण्या लाभते

१०. अती उदार तो सदा नादार :- आवश्यकता नसता खर्च केला की सतत आर्थिक चणचण निर्माण होते.

११. बस बुध्दी गर्वी :- स्वतःजवळ जरी थोडीशीच हुशारी असेल तरी त्या हुशारीने अगदी हुरळुन जाणे.

१२. अक्कल नही पण मुलगा तर दाना आहे :- एखाद्या मुलगा बुध्दीमान नसुन फार चाणक्य असणे

१३. बडी की लक्ष्मी वडी :- पैस श्रेष्ठ की बुध्दी श्रेष्ठ

१४. अचाट बुध्दी चालवावी आणी बळेच लक्ष्मी मिळवावी :- बुध्दी तेज असुन तिचा जर योग्य उपयोग केला तर संपत्ती आपण होऊन घरी चालुन येते.

१५. आडण्याची मोळी भलल्यासच गिट्टी :- अडाणी मनुष्याने एत्रादी गोष्टी केली असता तिचा परिणाम विपरीत होते.

१६. अठरा विश्वे दारिद्रय :- अतिशय गरीबी

१७. अळीमीळी गुपचिळी :- गुप्तपणे केलेले एखादे काम

१८. अचाट खाणे मसणात जाणे :- खाण्यापिण्यात अतिरेक झाल्यास वाईट परिणाम होतो.

१९. अति तेथे माती :- कोणत्याही गोष्टीची अतिरेक केल्यास त्याचे परिणाम दुःखदायक होतात.

२०. आसु ना मासु कुत्र्याची सासु :- जिव्हाण नसताना वरवर कळवळा दाखवणे

२१. इकडे आडा तिकडे विहीर :- दोन्ही बाजुनी सारख्याच अडचणीत सापडणे

२२. इच्छा तसे फळ :- मनात एखादी इच्छा ठेवुन कार्य करीत राहीले तर त्याचे चांगलेच फळ मिळणे

२३. इच्छा तेथे मार्ग :- इच्छा तीव्र असती की ती पुर्ण करण्याचा मार्ग आपोआप सापडते

२४. इच्छालेले घडते तर भिडुकाही राजे होते :- इच्छेप्रमाणे सारे घडते असते तर सारेच लोक धनवान झाले असते.

२५. उसाच्या पोटी कापुस :- कर्तबगार व्यक्तीच्या पोटी आळशी व निरदयोगी संतती

२६. ऊस गोड लागला म्हणुन मुळासकट खाऊ नये :- एखादी गोष्ट
चागली म्हणुन ती नष्ट होईल एवढा तिचा उपयोग घेऊ नये

२७. ऊन पाण्याने घर जळत नाही :- एखाद्यावर खोटे आरोप केल्याने
त्याची बेअब्रु होत नाही.

२८. उभ्याने यावे नी ओणण्याानने जावे :- कोणतेही काम खाभमान राखुन
करावे आणि त्या कामाचे श्रेष्ठ नम्रपणाने हयावे

२९. उभारले राजवाडे नि तिथे आले मनकवडे :- श्रीमती आली की तिच्या
मागेमाग हाजी हाजी करणारेही येतात.३०. उपसा पसारा मग देवाचा आसरा :- आधी काम पुर्ण
करावे नतर देवाची करुणा भाकावी

३१. उपट सुळ घे खाद्यावर :- नसते लचांड पाठीमागे लावुन घेणे.

३२. उधारीचे पाते नि सल्वा हात रिते :- उधारीच्या मालात काही ना काही दोष असतोच

३३. उद्योगाची घरी रिध्दीसीध्दी पाणी भरी :- उधारीच्या मालात काही ना काही दोष असतोचा

३४. लोणात एक आणी पोटात एक :- बाहेर बोलणे वेगळे आणि मनात वेगळे

३५. आपला तो बाब्या दुस-याच ते कारट :- मनुष्य स्वतः संबधी जी उदार बुध्दी ठेवतो ती इस-यया संबधी ठेवत नाही

३६. आवळा देऊन कोहळा काढणे :- क्षुल्लक वस्तुच्या मोबदल्या मोठा लाभ करुन घेणे

३७ आधीच उल्हास त्याच फाल्गुन मास :- आधीच इच्छा नसताना आणखी नकारर्थी घटना घडणे

३८. आपली पाठ आपणास दिसत नाही :- स्वतःचे दोघ स्वतःला दिसत नाहीत.

३८. आधीच तारे त्यात गेले वारे :- विचित्र व्यक्तीच्या वर्तनत भर पाडणारी घटना घडणे

३९. आपल्याच पोळीवर तुप ओढणे :- फक्त स्वतःचाच फायदा करुन घेणे

४०. आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी :- एकीकडे रोग व त्याचा उपाय भलती कडेच असणे

४१. आग खाईल तो कोळसे ओकेल :- जशी करणी तसेच फळ मिळत असते

४२. अर्थी दान महापुण्य :- गरजु माणसाला दिल्यास मोठे पुण्य मिळते.

४३.असतील शिते तर मिळतील भुते :- आपल्याजवळ संपती असली म्हणजे शेकडे लोक सभोवती जमा घेतात

४४.असगाशी सग आणी प्राणाशी गाठ :- भलत्याच माणसाशी मैत्री जडली तर आपले प्राण थोडक्यात येतात

४५.अति उदार तो सदा नादार :- जो मनुष्य अतिशय उदारपणे खर्च करतो त्याला नेहमी आर्थिक अडचण असते

कु.गायत्री हुंडीवाले
बी.ए.-व्दितीय वर्ष

**वेदांचा आविष्कार :**

वेद कसे निर्माण झाले याविषयी अनेक मते आढळून येतात. परमात्मा किंवा ईश्वर या महाभूताचे निःश्वास म्हणजे वेद होत, असे बृहदआरण्यक उपनिषदात सांगितले आहे. वेद हे शब्दस्वरूप असल्याने ते आकाशातून उत्पन्न झाले असेही एक मत आहे.

**वेदांचे महत्त्व व प्रामाण्य :**

वेद हे आर्यधर्माच्या मुलस्थानी आहेत. 'वेदोडखिलो धर्ममूलं' असे मनुवचन प्रसिद्धच आहे. वेदांवरून तत्कालीन आर्य जणांच्या भौतिक उन्नतीची कल्पना येते. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या तीन गोष्टींच्या माध्यमातून आर्यांनी भौतिक उत्कर्ष साधला होता. वेद, स्मृती, सदाचार आणि स्वतःच्या अंतः करणास जे बरे वाटले ते, अशी धर्माची चार प्रकारची लक्षणे आहेत. भारतीय आस्तिक दर्शनानी आपापले तत्वज्ञान मांडतांना वेदांचा आधार घेतला आहे.

**वेदांचे स्वरूप :**

वेदांमध्ये अग्नी, इंद्र, वरुण, उषा, मरुत अशा विविध देवतांची स्तुतीवर सुक्ते आहेत. वैदिक ऋषींनी निसर्गातील वेगवेगळ्या शक्तींना उद्देशून रचलेली ही स्त्रोत्रेच आहेत. वैदिक काळातील कुटुंब व्यवस्था, लोकजीवन, संस्कृती, आश्रम व्यवस्था, शिक्षण पद्धती, राष्ट्र दर्शन, तत्वज्ञान विषयक संकल्पना अशा विविध मुद्द्यांची माहिती आपल्याला वेदांमध्ये अभ्यासायला मिळते.

**अंकित सेवकराम जामनिक**
**बी.ए. अंतिम वर्ष**

---

जीवन के इस कठीन सफर मे
हार ना कभी स्वीकार करो
नौकाओ की छोड प्रतिक्षा
तैर के दरिया पार करो
पंख काट दिये तो क्या
हौसलो की उडान भरो
हो चुनौतिया हम से बढकर
निरंतर तुम प्रहार करो
भले हि हो घनघोर अंधेरा
साहस से हर कार्य करो
प्रयत्न कर नयी ज्योती जलओ
सेवरे का इंतजार न करो
आंधियो से आंख मिलाओ
चहोना पर वार करो
तुफानो मे दिप जलाओ
जिवन को भु सार करो

वेदांत शिरभाते
बी.कॉम.-१

---

।। जेव्हा मेहनत करुन सुध्दा स्वप्न पुर्ण होत नाहीत,
तेव्हा रस्ता बदला, सिध्दांत नाही.
कारण झाड नेहमी
पान बदलतात मूळ्या नाही. ।।




## आझादी का अमृत महोत्सव
## स्वतंत्र भारतासमोरील आव्हाने

तिरंगी झेंडा फडफडे
जय जाय कार बोला
१५ ऑगस्ट आज
आमुचा भारत देश स्वतंत्र्य झाला

१५ ऑगस्ट हा भारताचा राष्ट्रीय सण आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटीश राजवटीपासून मुक्त झाला. आणी एक स्वतंत्र्य राष्ट्र नावाने तेव्हापासुन भारतीय हा दिवस स्वतंत्र्य दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. या दिवशी जेव्हा देश स्वतंत्र्य झाला. तेव्हा भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी लाल किल्यावर ध्वज फडकवला. तेव्हापासुन दरवर्षी देशाचे पंतप्रधान लाल किल्यावर ध्वज फडकवतात, राष्ट्रगीत गातात आणि २१ तोफांसह सर्व शहीद झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांना श्रध्दाजली वाहतात. या दिवशी भारताचे पंतप्रधान आपल्या भाषणाव्दारे देशाला संबोधीत करतात. स्वंतत्र्य भारतासमोरील आव्हाने बेराजगारी, भ्रष्टाचार, लोकसंख्या, पाणी संकट, पर्यावरणाची हाणी खुप वाढली आहे. संपूर्ण जगात सर्वात मोठा देश म्हणून भारताची जागतिक प्रतिमा उंच आहे. पण अंतर्गत समस्यांनी तो अस्वस्थ झालेला आहे. आपला आधुनिक भारत अनेक समस्याशी झुंजत आहे. २१ व्या शंतकात बेरोजगाराच्या मनात सर्वाबदल विद्राहाची भावना, समाज तवेच देशविरोधी कार्य वाढत आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक आव्हाने अधिक गडद झालेली आहे. त्यामुळे गंभीर संकट देशापुढे उभे राहीलेले आहे. प्रचंड लोकसंख्या वाढीमुळे गरीबी, बेरोजगारी, घराचा प्रश्न, अन्नधान्याचा प्रश्न, सार्वजनिक आरोग्य अशा प्रकारची अनेक आव्हाने आपल्या देशासमोर निर्माण झाली आहे. लोकसंख्या जास्त वाढल्याने जंगले तोडली त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. मोठ्या प्रमाणावर माणसांकडून पाण्याचा दुरुपयोग केला जात आहे. समुद्रातील जिवजंतुंचे प्राण धोक्यात आले आहे. भारतातील सर्वच धरणातील पाणी संपण्याच्या अवस्थेत येऊन पोहचले असून वाढती महागाई, विज. टंचाईचे संकट आणि पिण्याच्या पाण्याचे आव्हान देशासमोर उभे राहीले आहे. पर्यावरण प्रदुषणाचा परिणाम अत्यंत हानीकारक आहे. आज अनेक रोग आहेत. जे दुषित पाणी दुषीत हवा आणी दुषित वायुच्या प्रभावामुळे घातक बनले आहे. भ्रष्टाचार ही आपल्या देशाला लागलेली किड आहे. भ्रष्ट लोकामुळे देशाची अर्थव्यवस्था पोखरलेली आहे. देशात असुविधा आणि विषमता निर्माण झाली आहे. काळाबाजार भ्रष्टाचार ही मोठी समस्या आपल्या देशासमोर उभी आहे. २१ व्या शतकात देशात महिलाच्या सुरक्षेचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. उदा. भ्रूणहत्या, हुंडाबळी, म्हणुनच महिलांच्या सुरक्षेचा हा विषय आपल्या देशासमोर एक मोठी समस्या व आव्हान आहे. भारतात जात, धर्म, शिक्षण, श्रीमंती, अशा अनेक पातळ्यांवर भीषण विषमता आहे. त्यामुळे जातीसंघर्ष हा पेटलेला असतो. त्यातुन दहशतवादाचे मोठे आव्हान देशापुढे उभे आहे. भ्रष्टाचार करणा-यानी कायद्याचा नियम बघायला हवा, प्रत्येकाने सुरुवात स्वतः पासूनच करायला हवी प्रामाणिकपणे काम करणा-या लोकांना प्रोत्साहन देऊन, त्यांच्या कामाला वाव दयायला हवा. पर्यावरणाचे संकट टाळण्यासाठी लोकांना जागरुक करायला हवे. वायु प्रदुषाणावर पूर्ण भर देणे, जंगल तोड थांबवणे, पावसाचे पाणी गोळा करुण ठेवणे, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन पर्यावरणाला कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. वैद्यकीय क्षेत्रात नवे शोध लावून त्या आजारावर मात करण्याचे आव्हान स्वीकारावे उदा : कोरोना महामारीचे संकट देशासमोर खूप मोठे अव्हाण आहे. अशा अव्हानांचा सामना करण्यासाठी क्षमता देशात असावी. आपल्या भारता समोर गरीबी व बेकारी हे एक मोठे अव्हान आहे. पण आम्ही ते स्वीकारले आहे हरितक्रांती, श्वसतक्रांती यांनी प्रत्येकालाच चारा उपलब्ध केला आहे. संगणकामुळे बेकारी वाढेल असे वाढत असतानाच संगणकाने अनेक व्यवसाय निर्माण केले आहे. असा हवा भारत देश, जिथे सगळ्यांची जात ही भारतीय असेल. धर्म देशप्रेम उच्च निच भेदभाव सिमा पार असेल भारतीयत्वाच सुख शांती समाधान मिळेल शत्रुचा थरकाप उडवील एवढी विचारांना धारना असेल, प्रत्येक भारतीयाचा अन्यायावर होणारा वार असेल जगातल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात आदर असेल.

कु.वैष्णवी अरुण राऊत
बी.कॉम प्रथम वर्ष



पुस्तकांचे मूल्य रत्नांपेक्षा अधिक आहे,
कारण पुस्तके अंतःकरण उजळवतात.
- महात्मा गांधी -

## नेताजी सुभाषचंद्र बोस : संघर्ष आणि जीवन

सुभाषचंद्र बोस याचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओरिसाच्या कटक शहरात झाला होता. त्याचे वडील जानकीनाथ बोस एक प्रख्यात वकील होते. त्याची आई प्रभावती देवी एक धार्मिक स्त्री होती. प्रभावती आणि जानकीनाथ यांना १४ मुले, सहा मुली आणि आठा मुलगे होती. त्यापैकी सुभाष लहान होता. कटक येथील प्रोटेस्टंट स्कुलमधून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर १९०९ मध्ये ते रेव्हेनशा कॉलीजीएट स्कुलमध्ये दाखल झाले महाविद्यालयाचे प्राचार्य निशीमाधव दास यांचा व्यक्तिमत्वाचा सुभाषच्या मनावर चांगला परिणाम झाला. वयाचा पधाराव्या वर्षी सुभाष यांनी विवेकानंद साहित्याचा संपूर्ण अभ्यास केला होता. १९४५ मध्ये ते आजारी असुनही दुस-या वर्गात इंटरमिडियरची परीक्षा उत्तीर्ण झाले १९१० मध्ये जेव्हा ते तत्वज्ञान मध्ये बी.ए.चे विद्यार्थी होते तेव्हा

प्रिसीडिंसी कॉलेजमध्ये भांडण चालू होते, तेव्हा सुभाष यांनी विद्यार्थ्यांने नर्तृत्व केले आणी त्यासाठी त्यांना प्रिसीडिंसी कॉलेजामधुन काढून टाकण्यात आले. एक वर्षा नंतर परीक्षा दिली. काही इतिहासकारांचा असा विश्वास आहे की नेताजीनी जपान आणि जर्मनीकडून मदत मिळवण्याचा प्रयत्न केला तेव्हा १९४१ मध्ये ब्रिटीश सरकाराने आपल्या हेरांना तेथुन दूर करण्याचा आदेश दिला. ५ जुलै १९४३ रोजी नेताजींनी सिंगापुरच्या टाऊन हॉलसमोर सैन्याला सुप्रिमकमांडर म्हणून संबोधल केले. दिल्लीत या आणी जपानी सैन्याने एकत्रिपणे बग्रदूशासह इम्फाल आणी कोहिमा येथे राष्ट्रकूल सैन्यातुन जोरदार आघाडी घेतली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सुभाष बोस यांनी आझाद हिंदी फौजाचा सर्वाच्च कमांडर म्हणुन स्वंतत्र भारतातील तत्पुरते सरकार स्थापन केले ज्याला जर्मनी, जापान, फिलीपीन्स, कोरीया, चीन, इटली, मुचूकुओ, आणी आयलॅडसह देशाचा सरकारानी मान्यता दिली या अस्थायी सरकाराला जपानी अदमान आणी निकोबार बेटे दिले सुभाष त्या बटेवार जाऊन त्यांचे नाव बदलते ६ जुलै १९४४ रोजी त्यांनी रंगुन रेडीओ स्टेशनजवळ महात्मा गांधीकडे एक प्रसारण केले ज्यामध्ये त्यांनी या निर्णायक लढाईत विजयाच्या शुभेच्छे आणी शुभच्छे मागीतल्या नेताजीच्या मृत्यबदल अजुनही वाद आहे त्याचा शहीद दिन प्रत्येक वर्षी जापानमध्ये १८ ऑगस्ट रोजी साजरा केला जात असताना सुभाष १९४५ मध्ये मरण पावला नाही असे त्याचे कुटूंबाचे अजनही मानतात त्यानंतर ते रशियाचे नजरकैदेत होते भारत सरकारने अद्याप त्याच्या मृत्युशी संबधीत कागदपत्रे सार्वजनिक का केली नाहीत १६ जानेवारी २०१४ कोलकाता हायकोर्टाने नेताजीनी बेपत्ता होण्या संदर्भातील संदर्भातील गुपचरांनी कागदपत्र सामन्या करण्याच्या उद्देशाने जगाहित याचिका ऐकण्यासाठी विशेष पाठ तयार करण्याचे आदेश दिले. १९२७ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस तुरुंगातुन बहिर आले आणी त्यांनतर त्यांनी राजकीय कारकीर्द आधार देऊन दिली लागली. आपल्या अटी ४१ व्या दिवशी सुभाषचंद्र बोस यांनी कॉग्रेस पक्षाचे सरचिटणीपद मिळवले आणी ब्रिटीशाच्या तावडीतुन गुलाम असलेल्या भारतातल्या मुक करण्याचा लढाईत भारताचे पहिले पतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु याचा बरोबर काम करण्यात सुरुवात केली. सुभाषचंद्र बोस आपल्या कामामुळे लोकावर आपला प्रभाव सोडत होते. म्हणुन ३ वर्षानंतर त्यानी कोलकाता महापौरपदी निवड झाली १९३० च्या दशकांच्या मध्याभागी नेताजीनी नतिही मुओलिनियह युरोपमध्ये प्रवास केला. दुस-याया महादयुध्दात कॉर्ग्टसाच्या नेतृत्वाचा सल्ला ने होता व्हाईसरॉय लॉर्ड लिनिलियेगोच्या भारताच्या बाजुने युध्दाना जाण्याच्या निर्णयाच्या विरोधात सुभाषचंद्र बोस यांनी जन जागारी अवज्ञाचे समर्थन केले. त्यानी या निर्णयामुळे त्याना ७ दिवस तुरुगांची शिक्षा भोगावी

या दरम्यान दुसरे महायुध्द सुरु झाले नेताजीची मत होते की इंग्रजाच्या शत्रु सोबत मिळुन स्वतंत्र्य लवकरच प्राप्त करता येईल. त्याच्या विचाराना लक्षात घेऊन ब्रिटीश सरकाराने त्यांना कोलकाता नजर बंद केले. परंतु त्याचा भाचा शिशिर कुमार बोस यांच्या मदतीने ते नजर कैदुतुन मुक्त झाले व अफगाणीस्तान व सिव्हिएत संघाच्या मार्गाने ते जर्मनी जाऊन पोहचले राजनिती मध्ये पुर्ण सक्रिय होण्याआधी नेताजीनी जवळपास संपुर्ण जगाचे भ्रमण केले. १९३३ पासुन १९३६ पर्यंत ते युरोपात राहिले ती लाल हिरलट च्या नार्जीवाद व मुसोलीनी च्या फार्सवाद चा होता नाजीवाद व मुसोलीनेच्या फार्सवाद चा होता नाजीवाद आणी फार्सावाद चा होता नाजीवाद आणी फार्सवाद च्या निशाण्यावर इंग्लड हाच देश होता कारण इंग्लड ने प्रथम विश्व युध्दानतर जर्मनी वर एकतर्फी करार लादले होते. त्याच बदला जर्मनी इंग्लड कडुन घेणार होता. दुसरे कडे भारतावर देखील इंग्रजाचे राज्य होतें शत्रुचा शत्रु हा मित्र असतो अशी म्हण आहे. म्हणुन नेताजीना हिटलर आणी मुसोलीनी मध्ये आपले भविष्यातील मित्र दिसत १९३७ मध्ये नेताजीनी आपली ऑस्ट्रीलियातील सेक्रेटरी एमिलशी लग्न केले त्या दोघाना अनिता नावची एक मुलगी सुध्दा झाली जी सध्या जर्मनी मध्ये सहपरिवार राहत आहे जर्मनीत असतानाच नेताजी हिटलर ला जाऊन भेटले त्यानी देशाला स्वतंत्र्य करण्यासाठी काही महत्वाची कार्य पण केली १९४३ मध्ये त्यांनी जर्मनी ला सोडुन दिले व तेथुन ते जापन जाऊन पोहोचले जपान मधुन सिंगापुर ला गेले जिथे कॅप्टन मोहन सिंह व्दारा स्थापीत आझाद हिंद सेना ची कमान त्यानी आपल्या हाती घेतली त्या काळात रास बिहारी बोस आझाद हिंद सेनेचे प्रमुख नेता होते. नेताजी च्या नावने प्रसिध्द असलेले सुभाष चंद्र बोस यांनी सशत क्राती व्दारे भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सरकार ची स्थापन केली तसेच आझाद हिंद फौज ला गणीत केले

या संघाच्या प्रतिक चिन्ह असलेल्या झड्यावर डरकाळी मारणा-या वाघाचे मित्र होती नेताजी आपल्या आझाद हिंद फौज सोबत ४ जुले १९४४ ला बर्मी पोहोचले इथेल त्यानी आपल्या प्रसिध्द नारा तुम मुझे खुद दो मै तुम्हे आझादी दुगा १८ ऑगस्ट १९४५ ला टोकिया जाताना तैवान जवळ हवाई दुर्घटने दरम्यान नेताजीनी मृत्यु झाला परंतु त्याचे मृत शरीर मिळाले नाही. म्हणुनचे नेताजीच्या मृत्युच्या कारणावर आज देखील विवाद सुरु आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस हे उच्चविद्याभुषित होते. त्यांनी आय.सी.एस.ची परीक्षा इंग्लडला दिली होतीतथापी कॉनवेल्थ सैन्याने अचानक प्लला केल्याने जापानी आणी जर्मनी सेन्याने आश्चर्चचकित केले. त्यांनतर सुभाषचंद्र बोस जुलै १९४३ मध्ये जर्मनीहुन सिंगापुरला गेले आणी तेथेच त्यांनी भारतीय राष्ट्रीय सैन्य स्थापनेच्या आशेला पुन्हा जिवंत केले अध्यक्षस्थानी बिहारी बोस होते नतरे रेश बिहारी बोस यांनी या संस्थेची संपुर्ण जबाबदारी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे सोपविली त्याच वेळी आयानए आझाद हिंद फौज आणी सुभाषचंद्र बोस यांनी नेताजी म्हणुन ओळखले जाऊ लागले नेताजीनी केवळ सैन्याने एकत्रित केले नाही तर आग्नेय आशियातील डायस्पीरा भारतीयाचेही लक्ष वेधले. ॲडम वॉन ट्रॉट झु सिलझ यांच्या मार्गदर्शनाखाली सुभाषचंद्र बोस यांनी जर्मन पुरस्कृत आझाद हिंद रेडिओवर प्रसारीत करणा-या स्पेशल ब्युरो यांनी शत्रुचा शत्रु मित्र असल्याच्या गोष्टीवर अवलबुन शदुन ब्रिटीश सामाजाविरुध्द जर्मनी आणी जापानचे सहकार्य घेतले. बोस यांनी बर्लिनमध्ये फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली होती. तेव्हा सुमारे ३००० भारतीय कैद्यानी फ्री इंडीया सैन्यासाठी स्वाक्षरी केली होती. युध्दामध्ये जर्मनीची पडझड आणी अखेर जर्मन सैन्याने माघार घेतल्यामुळे सुभाषचंद्र बोस यांना समजले की आता जर्मन सैन्या इग्रजाना भारताबाहेर मदत करु शकणार नाही.

कु.श्रेया विश्वकर्मा
बी.कॉम प्रथम वर्ष

# नदीचा पलीकडे

नदीचा पलीकडे राळा पेरला बाई,राळा पेरला
एके दिवशी काऊ आला बाई,काऊ आला
एकच कणीस तोडून नेला बाई,तोडून नेला
सईचा अंगणात टाकून दिलं बाई घरांत नेले
सईने उचलून घरात नेले बाई घरांत नेले
कांडून कांडून राळा केला बाई, बाजारात गेली
पाच पैशाची घागर आणली बाई ,घागर आणली
घागर घेऊन पाणाला गेली बाई, पाणाला गेली
तोच तिचा मधला बोटाला विंचू चावला बाई,विंचू चावला
आला माझा सासरचा वैद्य
डोकात टोपी फाटकी तुटकी
अंगात सदरा फाटकं तुटकं
पाात बुट फाटके तुटके
हाती काठी जळकं लाकुड
तोंडात विडा शेणाचा
कसा गं दिसतो भिकानावाणी बाई, भिकानावाणी
आला माझा माहेरचा वैद्य
डोकात टोपी जरीकाठी
अंगात सदरा मखमलली
नेसाला धोतर भरजरी
पात बुट पंचरंगी
तोंडात विडा केशराचा
कसा ग दिसतो राजावाणी बाई राजावाणी.

गजानन ताथोड
बी.ए. भाग -२



। जीवनात आपला सर्वात सुंदर
सोबती आपला आत्मविश्वास आहे.।

# बंजारा होळी उत्सव

होळी हा शब्द तोंडात येताच त्या मागोमाग बोंबा आल्या. होळी सणाला बंजारा समाजात वेगळीच बोंब असते. आणि त्याच बरोबर या सणाला फार मोठा धार्मिक सण असे मानले जाते. पूर्वी बंजारा समाजात दिपावली संपताच होळीला सुरुवात व्हायची. हा समाज अत्यंत कष्टाळू आहे. ह्या समाजातील शेतकरी रात्रदिवस काबाडकष्ट करतो. दीपावली संपल्यावर शेतातील शेत मालावर रात्री जागरण करावे लागते. रात्री डफडा घेवून हा शेतकरी राखणी करतो, शेतात जातो आणि अशा रात्रीच्या वातावरणात कडाक्याच्या थंडीत होळी सणाकरिता म्हणावयाच्या गाण्याची रचना करतो. डफ वाजवून गाणे म्हणण्या मागे दोन उद्देश साध्य होते. रखवालदार शेतात असल्याबाबत चोराला खात्री पटते व रात्री शेतमालाची नासाडी करणारे जंगली प्राणी शेतात फिरत नाही, अशा दुहेरी उद्देशाने होळीच्या गाण्याला सुरुवात होते. जंगलात ते ही रात्री आजू बाजूला कोणीही नाही अशा वातावरणात होळीला साजेशी अशी गाणे म्हणत शेतातील शेतमाल पूर्ण जमा झाल्यावर रात्रीच तांड्यातील जवान पोर जमतात. मागील दोन-तीन महिन्यातील गाठणाऱ्या थंडीत गरम गरम जोडलेली गाणी आनंदात बुडून डफाच्या तालावर गातात. होळीचे गाणे म्हणायचे सुरुवातीला आया बहिणींची व थोरांची श्रमा मागतात.

**|| सामळोये याडी काकी ये दादी होळी बोलच भांड होळी बोलच भांड, माफी देदो होळी बोलच भांड ||**

आई, काकू व आजी आम्ही जी होळीची गाणे गातो ती आम्ही गात नसून प्रत्यक्षात होळीचेच अशा प्रकारे भांड गाणे गातो म्हणून आम्हाला क्षमा करावी अशा प्रकारची सुरुवात करून होळी गाणे गाण्यास तयार होतात. मात्र त्यांच्या अंगात जणू काही होळीच संचारल्या सारखी आणि त्या गारठया थंडीच्या रात्री जोडलेल्या होळी गाण्याला सुरुवात होते.

**"आंबारे आंबराईम केर छोरी कररी**
**रखवाल,आंबारे आंबराईम चव्हाणेर**
**छोरी कररी राखवाल झोलो देगी रे,**
**झोलेम बलान, झोलो देगी रेपाडेरो**
**आंबा वटान लेगी रे, झोले देगी रे...."**

आंब्याच्या आमराईत कुणाची पोरगी राखण करतांना दिसते त्यात दुसरा बोलतो की, त्याचा ज्या जातीच्या पोरीशी संबंध झालेला असेल अशा जातीचा उल्लेख करून (चव्हाण) जीची पोरगी आंब्याच्या झाडाखाली राखण करत बसली असे बोलतो. आणि पुढे जाताजाता हिने मला इशारा केला असून त्या इशाऱ्यात तिच्या मागे झालेला म्हणजे लवणा काठच्या घनदाट अरण्यात येण्यास सांगितले असेही तो बोलतो ही पोरगी आंब्याखाली बसलेली आहे हे भासविण्याकरिता पुन्हा बोलतो की पाडाचा आंबा घेवून गेली अन मला खुजावून गेली.

एवढेच नव्हे तर देवदिकांची स्तुती करणारी गाणी देखील गायिल्या जाते. सेवादास महाराज ज्योतीबाबा सारखी माला श्रीकृष्ण यांनी केलेल्या चमत्काराची कार्याची व समाज

सुधारणेची उजळणी करून समाजात त्याबाबत नवीन चेतना निर्माण केली जाते. संत सेवादास महाराज यांनी घेतलेल्या समाधीला प्रामुख्याने यात उल्लेख करून समाजातील नविन युवक-युवतीला त्या बाबत जाण दिली जाते.

**होळीचा पहिला दिवस**

**भर तलांगानेती आई घरे होळी,**
**होळी डगर चली होळी आई रे**
**होळी दस दन रेन्ह आई रे फेर**
**गेरीया नाचतो होळी आई रे ......**

अशा प्रकारे होळीची गाणी गात-गात होळीच्या पहिला दिवस उगवतो. त्या दिवसाला बंजारा समाजात होळीची पाल असे संबोधण्यात येते. या दिवशी पोर्णिमा असते. बंजारा समाजा व्यतिरिक्त सर्व समाजात आजच्या दिवशी होळी असते. मात्र बंजारा समाजात होळीची पाल असते. बंजारा समाजातील तांड्या तांड्यात वसलेली सर्व मंडळी आजच्या दिवशी कुणीही कामाला जात नाही.

संध्याकाळी गोडधोड करून खातात व रात्री दहाचे सुमारास गाव प्रमुखाचे (नायक) घरी होळीचा डाव मांडल्या जातो. गाव प्रमुख येथे जमलेल्यांना वयोवृधांची मिटिंग बसलेली असते. आपल्या धुंदीत त्या पाडयाच्या आंब्याची किंवा ह्यापेक्षाही सरस असलेली गाणी गात नाचतात. वयोवृद्ध मंडळीत होळीची (दिंडी) काढण्याबाबत चर्चा सुरु असते.

दांडी म्हणजे होळीतील श्रीकृष्ण व होळी त्यांना जळत्या होळीतून बाहेर काढावे लागते. त्याकरिता विभिन्न कुळातील अर्थात बंजारा जमातीचेच दोन युवकांची निवड केल्या जाते. ती निवड वैशिष्टपूर्ण असते त्या दोन युवकांचे आडनाव विभिन्न असावेत, हे अविवाहित असावेत, आणि याच वर्षी यांची लग्न व्हायला पाहिजे अशा बाबींचा प्रामुख्याने विचार केल्या जातो. ह्या सणाच्या कामाकरिता ( दांडी) काढण्याकरिता माझ्या पोराचा नंबर लावण्यासाठी कित्येक लोक भांडतात. होता होई पर्यंत सामोपचाराने विचार केला जातो पण काही वेळेस मात्र भांडणाचा प्रकार घडतो. ह्या कामाकरिता दोन युवक नेमल्यानंतर दरवर्षी ज्या ठिकाणी होळी जाळली जाते त्याच ठिकाणी जावून त्या जागेची पूजा करतात. ती नेमलेली दोन युवक गावातील युवकांच्या मदतीने रात्रभर लाकडे जमा करण्याचा व्यवसाय जोरात करतात. सकाळी ६ वाजेच्या पहिले गावातील सर्व लहान थोर पुरुष मंडळी होळीच्या ठिकाणी आंघोळ करून नविन कपडे घालुन जमतात व सकाळी ६ वाजता होळी जळतात.

**|| ओरे बाळारो हुओरे तेवार मोड मोड किदी संणगार ||**

## होळीचा दुसरा दिवस

होळीच्या दुसऱ्या दिवशी पूर्वजांना चूलीमध्ये भोग देऊन नैवेद्या दाखविला जातो. नंतर गावकारभार पाहणारे कारभारी यांचे घरी होळीचे ठिकाणावरून सरळ जातात व त्या

प्रयत्न करतात पण काय करणार बिचार ह्या खांबाच्या बुडाजवळ बऱ्याच बाया हातात काडया घेवून उभ्या राहतात. ज्या युवकांना खोबरा आणि बत्तासा खायचा असेल ते युवक मोठ्या जोरात त्या खांबावर चढणाऱ्या युवकांना बेदम मारतात. दोन तीन युवक त्यांना फार चकवतात आणि एखाद्याला चान्स मिळताच तो खांबावर चढण्याचा प्रयंत्न करतो व खुप मार खावून बेजार होतो. खांबावर चढणे कठीण होते. जो खांबावर नाही चढू शकत त्यांना त्या स्त्रिया बांगड्या पण घालण्यास सांगतात त्यात तर एखादयाला चिड येवुन पाठीला गोंधले बांधतो आणि झपाटयाने वर चढतो मात्र वर चढल्यावर तो राजाच होतों, खांब्यावर आरामात बसतो खोबरा खातो, चावतो, रस गिळतो आणि तोंडातील चुरा खांबाजवळील स्त्रियांच्या अंगावर थुकतो, तर चढलेला खाली उतरेपर्यंत ह्या स्त्रिया येथून जात नाही कारण उतरतांना पुन्हा याची पाठ शेकायची संधी असते. या स्त्रिया पण हुशार असतात सात ते आठ फुटावर एखादया स्त्रीच्या अंगावर उडी मारतो व पळून जातो.

"दारू दर दारू द बालाजी तारो भलो कर
आतराके दारू ती काई व्हीयरे लारे लारे
मनुरियो ढेर व्हीयरे"

## होळीचा दिवस गेर सळोई

धुलीवदंनचे दुसरे दिवशी म्हणजे पौर्णिमेनंतर चवथे दिवशी बंजारा समाजात होळीची गेर हा सण असतो. ह्या सणाला घरोघरी तांड्या व वर्गणी करूनच पैसे जमा केल्या जाते. त्या पैशात बोकूड घेवुन त्यांचे तांड्यात असलेले सर्व घरांच्या संख्ये इतके समान हिस्से पाडले जातात आणि मटनापासून "सळोई" बनविले जाते. बंजारा समाजात मटनापासून सळोई हा जो प्रकार असतो तो महत्त्वाचा मेनू आहे. कोणत्याही समाजातल्या मटन खाणाऱ्यांनी हा प्रकार खाल्यास ह्या सारखी चव कोणत्याही प्रकारे केलेल्या मटणाचा प्रकार याची बरोबरी करणार नाही असे त्यांना वाटेल. होळी नंतर मात्र कोणीही एकमेकांना वाईट बोलत नाही अशा प्रकारे बंजारा समाज होळीचा सण साजरा केली जातो.

**कु. पुजा उल्हास चव्हाण**
**बी.ए.भाग -३**

---

**।।कोणाच्याही सावलीखाली**
**उभा राहील्यावर**
**स्वतःची सावली कधीच**
**निर्माण होत नाही.**
**स्वतःची सावली निर्माण करण्यासाठी**
**स्वतः ऊन्हात उभे राहवे लागते.।।**



## आनंद

हिंन्दु धर्मानुसार आनंद स्वतःच्या कृतीतून, मागील कृतीतून आणि देवाच्या कृपेने प्राप्त होतो हिंदु ग्रंथामध्ये आनंदाचे तीन प्रकार सांगितले आहेत. हे खालीलप्रमाणे आहेत.

। भौतिक सुख : याला भौतिक सुख असेही म्हणतात. हे आरामदायक जीवन शारिरीक सुख आणि कांमुक आनंदाने मिळवता येते.

। मानसिक आनंद : याला मानसिक आनंद असेही म्हणतात. तृप्ती आणि समाधानाच्या भावनतून हे साध्य करता येते, ही एक अशी अवस्था आहे ज्यात एक व्यक्ती सर्व प्रकारच्या चिंता आणि दुःखापासुन मुक्त आहे.

। आध्यात्मिक आनंद : याला आध्यात्मिक आत्म आनंद असेही म्हणतात. जो माणूस जन्म आणि मृत्युच्या चक्रातून बाहेर येतो आणि स्वतःशी समेट करतो, तेव्हा या प्रकारचा आनंद मिळू शकतो. हिंदू धर्मानुसार जगण्याचे अंतिम ध्येय म्हणजे स्वर्गात मुक्त आत्मा म्हणून परम आनंदाचा अनुभव घेणे. मनुष्य आपली कर्तव्ये पार पाडुन तात्पुरता आनंद अनुभवू शकतो, परंतु हिंदु धर्मानुसार मुक्ति मिळवूनच स्वर्गात कायमस्वरुपी आनंद मिळू शकतो.

## आनंद चागल्या जीवनासाठी आवश्यक :

तुम्ही विद्यार्थी असोत, व्यावसायिक आहात, गृहिणी आहात किंवा निवृत्त आहात तुमच्या प्रत्येकासाठी चांगले जिवन जगण्यासाठी आनंद आवश्यक आहे. व्यक्तिच्या भावनिक कल्याणासाठी हे आवश्यक आहे. जर एखादी व्यक्ती भावनिकदृष्टया निरोगी नसेल तर त्याचे एकंदर आरोग्य लवकरच बिघडु शकते जरी आनंद खुप महत्वाचा असला तरी दुर्दवाने लोक स्वःला आनंदी ठेवण्याच्या मार्गावर जास्त लक्ष देत नाहीत. हे सर्वजण त्याच्या व्यावसायिक जिवनात आणि जिवनातील इरत कामामध्ये इतके गुंतलेले असतात. की ते आयुष्यातील चांगल्या क्षणाचा आनंद घ्यायला विसरतात तणाव, चिंता आणि नैराश्याची प्रकरणे दिवसेदिवस वाढत आहेत. यात आश्यर्च नाही. अशाप्रकारे आनंद ही एक अशी गोष्ट आहे. ज्यासाठी प्रत्येक मनुष्य आकांक्षा बाळगतो परंतु खूप कमी लोक ते मिळवु शकतात. परिभाषित करणे जितके सोपे आहे. तितके ते साध्य करणे अधिक कठीण आहे. याचे कारण असे की लोक सहसा ते लोक आणी गोष्टीशी जोडतात. आनंद ही अशी गोष्ट आहे जी तुमच्यापासून सुरु होते आणि तुमच्याबरोबर संपते.

कु.आकांक्षा बाळू इंगोले
वर्ग :- बी.ए. ३ वर्ष

## कविता

ख्वाहिश नहीं मुझे
मशहूर होने की,
आप मुझे पहचानते हो
बस इतना हि काफी है ।

अच्छे ने अच्छा और
बुरे ने बुरा जाना मुझे
जिसकी जितनी जरुरत थी
उसने उतना ही पहचाना मुझे

जिंदगी का फलसफा भी
कितना अजीब है
शामें कटती नहीं और
साल गुजरते चले जा रहे है ।

एक्ष अजीब सी
दौड है ये जिन्दगी
जीत जाओ तो कई
अपने पीछे छूट जाते हैं और
हार जाओ तो
अपने ही पीछे छोड जाते हैं ।

बैठ जाता हूँ
मिट्टी पे अकसर
मुझे अपनी
औकात अच्छी लगती है ।

मैंने समंदर से
सीखा है जीने का सलीका
चुपचाप से बहना और
अपनी मौज में रहना ।

ऐसा नही कि मुझ में
कोई ऐब नही है,
पर सच कहता हूँ
मुझमें कोई फरेब नहीं है ।

-: संकलन :-
मंदार जोहारी
बि.कॉम - १

## आधुनिक नारी

आधा विश्व समझी जानेवाली नारी आज भी अधूरी है । आज स्वावलंबी होकर भी परावलंबी है । कारण है परंपरा । परंपरा की जडे इतनी मजबुत है कि शिक्षित स्त्री भी उससे नहीं बच सकी । इसीलिए नारी के इतिहास (बीता हुआ कल) वर्तमान (आज) और भविष्य (आने वाला कल) के बारे में सोचना है । प्राचीनकाल से लेकर आधुनिक नारीकी समस्याएँ तथा परिस्थीतिओं को हम प्राचीनकाल मध्यकाल तथा आधुनिक काल कें बाँट सकते है । इन कालो के अंतर्गत दिखाई देता है कि नारी जिवन में कैसे कैसे परिवर्तन आता गया है साथही प्राचीनकाल से नारी ने क्या कुछ खोया क्या कुछ पाया है प्राचीन काल के अंतर्गत हमें वैदिक काल रामायण, महाभारत, की स्त्रियों का भी विचार करना पडेगा। प्राचिनकाल में नारी के देवी माता पत्नी कन्या ये रुप प्रधान माने गये है । प्राचीन काल मे स्त्री को देवी समझा गया है । किंतु स्त्री की कामना देवी बनना नहीं तो मानवी बनना रही है। रामायण काल तक स्त्री का रुप देवी, माता जैसा उदात्त रहा है किंतु महाभारत तक आते आते वह देवी से भोग्या बन गई । प्राचीन काल की नारी बधनो में जकडी शिक्षा तथा अधिकारो से कोसो दुर तथा पुरुषो के अधिन थी । बाल विवाह की समस्या सती प्रथा थी । साथही गौरवमयी बात स्त्री स्वयंवरा थी । आज तो यह भी स्थिति नहीं रही। प्राचीन काल में भी वैदिक युग में भी स्त्री की स्थिति अच्छी थी । मध्यमकालीन स्थिती में कोई विशेष अंतर नही अया । प्राचीन काल में देवी बनाकर अधिकारों से वंचित किया तो मध्ययुग में भोग्या बनाकर । स्त्री की कामना सदैव उसे मानवी समझा जाने की रही किंतु ऐसा किसी युग में नही हुआ । मध्यकाल अर्थात हिंदी साहित्य के रीतिकाल में स्त्री के शरीर का ही वर्णन है ।

मध्यकाल में एक और स्वतंत्रता आंदोलन था तो दुसरी और समाजसुधार आंदोलन । नारी की दशा सुधारने हेतु राजा राममोहन राय ने निर्दयी सती प्रथा का उन्मूलन किया । म.गांधी, म.फुले,स्वामी विवेकानंद आदी ने स्त्री सुधार के लिए प्रयत्न किए । परिणामतः स्त्री शिक्षित होकर अपने अधिकारों के प्रति जागरुक हो गई । परंतु पुरुषप्रधान संस्कृति का वर्चस्व बढने से स्त्री को कम समझा जाने लगा । एक और स्त्री शिक्षा तथा समाजसुधार के आंदोलन चल रहे थे तो दुसरी और स्त्री की आवाज को दबाने की कोशिश करनेवाला पुरुषवर्ग भी बन रहा था ।

आधुनिक काल सभी दृष्टि से आधुनिक रहा । समाज में नारी को समानता का दर्जा मिला । वह शिक्षित होकर अपने अधिकारो के प्रति जागरुक हो गई । अधिकार कैसे प्राप्त करना है यह आज की नारी समझ चुकी है । आधुनिक युग ने शिक्षा के कारण नारी के सामने नये नये क्षेत्र प्रस्तुत किए है । किंतु इसके साथ नयी - नयी समस्याएँ बनती - बढती जा रही है । भारतीय समाज में नारी की स्थिती विभन्न कालों में और विभिन्न समाजो में भिन्न - भिन्न प्रकारकी रही है । प्राचीन काल में उसे शक्ति, ज्ञान एवं संपत्ती के प्रतिक रुप में माना गया है । बाद में मध्ययुग में देवी रुप से निकालकर भोग्या रुप में बिठा दिया गया । आज आधुनिक युग मे स्त्री की स्थिती में कुछ सुधार आ रहे है । वह स्वावलंबी, अर्थनिर्भर बन गई है । वह अधिकारों के प्रति सचेत हो चुकी है । हर क्षेत्र में खेल, ऑलंपिक,वैज्ञानिक,राजनीतिक आगे बढ रही है । जो आधुनिक काल एवं शिक्षा की देन है ।

कु.भाग्यश्री राठोड
बी.कॉम.भाग - ३

# दवाळी याडी (बंजारा दिवाळी सण)

गोर बंजारा संस्कृती ही अति प्राचीन असून 'गोर' हा एक वंश आहे. या गोरवंशाला लोकांनाच भारतात बहुतांश 'गोर' बंजारा या नावाने ओळखले जाते. गोर- बंजारा हा एक समुद्ध सांस्कृतिक परंपरा असणारा भारतीय समाज रचनेचा महत्वाचा घटक होय. 'गोर-बंजारा' या शब्दातील 'गोर' या शब्दांची निर्मिती 'गो रक्षक' या शब्दापासून अधिक संभवनीय असल्याचे जाणकार सांगतात. यामधील 'गो' म्हणजे गाय व 'र' म्हणजे रक्षा. यावरून 'गोर' म्हणजे गाईचे पालनपोषण, रक्षण करणारा लोकगण म्हणजे 'गोर'.

बंजारा जमातीच्या समुदायासाठी 'गोरमाटी' असाही एक शब्दप्रयोग केला जातो. अर्थातच गोरमाटी हा शब्दप्रयोग बंजारा बांधव आपल्या स्वकीयांसाठीच करताना दिसतात. तसेच बंजारा हा शब्द आपल्या भारतीयांना अपरिचित आहे असे मूळीच नाही. अनेक सिनेगीतातून, हिंदी काव्यरचना इत्यादीमधून 'बंजारा' या शब्दाचा उल्लेख विविध ठिकाणी आपणास सापडतो. 'बंजारा' या शब्दाचा लोकगणासाठी व्यापक अर्थाने गोरबंजारा असा शब्द प्रयोग होताना दिसतो.

आपल्या भारतात वेगवेगळ्या राज्यांत, भौगोलिक प्रदेशात बंजारा समाज 'बंजारा' 'गोरमाटी' 'लमाणी' 'लमाण' 'लभाण' 'लभाणी' 'लभाणा' 'लंबाडा' 'सुगाळी' 'बाजीगर' 'यादगीर' इत्यादी अनेकविध नावाने ओळखला जातो. आजमितीला गोर-बंजारा समाज हा भारतातील जवळ जवळ सर्वच राज्यांमध्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये कमी - अधिक प्रमाणात वास्तव्यास असल्याचे पाहावयास मिळते.

बंजारा लोकगणाच्या संदर्भात एक बाब अशी दिसते की, गोर-बंजारांची लोकवस्ती आजही प्रामुख्याने डोंगराळ भागात डोंगर पायथ्याजवळ असल्याचे आढळून येते. डोंगराळ भाग निवडण्यामागे एक मुख्य कारण असे दिसते की गोर-बंजारांकडे मोठ्या प्रमाणात गुरे-ढोरे होती. त्यांना चारण्यासाठी ते वनाचा आसरा घेत असत. कालांतराने त्यांना स्थिरावणे भाग पडले असावे व 'बनचर' या शब्दाचे अपभ्रंश रूप 'बंजारा' असे झाले असावे. म्हणून 'बनचर' या शब्दापासून 'बंजारा' या शब्दाची उत्पत्ती असावी हेही नाकारता येत नाही.

भारतीय गोर-बंजारा समाजगण हा एक आदिम समाजगण असून त्यांची लोकसंस्कृती ही तितकीच पुरातन व लौकिक असल्याचे दिसते. गोर बंजाराचा इतिहास हा त्याग, बलिदान, शौर्य व पराक्रम यांनी समृद्ध आहे. उपजतच कष्टाळू, मुलतःच सृजनशील असा हा समाजगण असून आपले सांस्कृतिक अविष्कार सण-उत्सव . आदींच्या माध्यमातून व्यक्त करणारा, नाच-गाण्यात आनंद शोधणा-या बंजारा समाजाने कशीदाकारी सारख्या अनेक कलाकुसरींची मनोभावे जपणूक केली आहे. संपूर्ण भारतात गोर-बंजारा हा समाजगण सर्वत्र विखुरलेला असून भारताच्या अगदी कानाकोपऱ्यापर्यंत त्यांच्या वस्त्या आहेत. लदेणी व्यवसायाच्या निमित्याने मध्य युगा पर्यंत हा समाज भारताच्या वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशात अविरत भटकंतीचे जीवन जगत होता.

संस्कृती व समृद्धीने नटलेल्या मेवाडमध्ये 'राजपूत' घराणे वास्तवास होते. या समृद्ध भूमीवर सतत परकीय आक्रमण होऊ लागले. मेवाडमध्ये वारंवार होणाऱ्या रणसंग्रामामुळे राजपूत लोकांनी स्वतः चे रक्षण करण्यासाठी मेवाडचा त्याग केला.

भारताच्या व भारताबाहेरील प्रदेशात उदरनिर्वाहाचे साधन म्हणून व्यापार सुरु केला. तेव्हापासून या लोकांना बंजारा म्हणू लागले. 'बनज' या शब्दाचा अर्थ व्यापार होतो. दऱ्याखोऱ्यात राहून, व्यापार करून उदरनिर्वाह करणाऱ्या राजपूत वंशाची ओळख धूसर झाली. पण, लोकगीते व संस्कृतीमधून ती आजही टिकून आहे.

एकेकाळी राजस्थानमध्ये राहणाऱ्या बंजारा समाजाचे जीवन उद्ध्वस्त झाले. अल्लाउद्दिन खिलजीने सन १३०३ मध्ये चितोडगडावर स्वारी केली. त्यात ३० हजार हिंदूंची कत्तल केली. राजवाडे, किल्ले उद्ध्वस्त केले. आपल्या भूमीच्या रक्षणासाठी भूमिपुत्र प्राणपणाने लढले. तो दिवस होता. दिवाळीचा बंजारा समाजासाठी ही रात्र (दिवाळी) काळरात्र ठरली. तेव्हापासून दुःखी, हताश झालेल्यांचे सांत्वन करण्याची प्रथा पडली असावी, म्हणून या समाजातील कुमारीका आजही दिवाळीला दिवा घेऊन प्रत्येकाच्या घरी जातात.

हिंदू संस्कृतीमध्ये दिवाळी हा सण पाच दिवस साजरा केला जातो. मात्र बंजारा संस्कृतीमध्ये दोन दिवस हा सण अगदी पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. बंजारा समाजामध्ये दिवाळी या सणाला 'दवाळी' हा शब्द रूढ झाला आहे. या दिवशी तांडयातील सर्व मुली नायकाकडे जाऊन दिवाळीची ओवाळणी करण्याची परवानगी मागतात.

पाच दिवसातील पहिला दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन होय. त्या दिवशी सगळे हिंदू लोक मोठ्या थाटाने दिवाळी साजरी करतात. दिवे लावतात, फटाके फोडतात आणि खूप मज्जा घेतात. पण बंजारा समाजामध्ये या व्यतिरिक्त दीपोत्सव वेगळ्या पद्धतीने साजरी करतात. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी सकाळी तांडयाचा 'नायक' (तांडा प्रमुख) तांड्यातील प्रत्येक घरी जाऊन मुलींना 'मेरा' मागायला पाठवा म्हणून सांगतो. असे सांगत तो नायक प्रत्येकाच्या घरी जाऊन सांगतो. मग मुली संध्याकाळी 'मेरा' मागायला जावे लागते म्हणून तयारीला लागतात. दिवा घेवून जायचं असते म्हणून त्या 'ढाकणीला' (मोठी पणती) सजवतात. आणि त्या ढकणीत मोठी वात करतात. म्हणजे पूर्ण तांडा फिरेपर्यंत ती वात पूरावी.

संध्याकाळी लक्ष्मीपूजन झाल की मुली 'मेरा' मागायला जायच आहे म्हणून तयारीला लागतात. छान नवीन नवीन कपडे घालतात. या दिवशी तांड्यातील सर्व मुली नायकाच्या घरी दिवे घेवून जातात. पहिले घर 'नायकाचे' आणि दुसरे घर 'कारभारीचे' आणि मग सगळी घरे तांड्यात जेवढे घरे असतील तेवढ्याही घरी मुली दिवे घेवून जातात. नायकाच्या घरी गेल्यावर नायकाची बायको म्हणजे 'नायकीनबाई' सगळ्या कुमारिकांना हळद, कुंकू लावून प्रसाद देते. आणि मग सगळ्या मुली मेरा मागायला सुरवात करतात आणि सगळ्या कुमारीका वर्तुळाकार पद्धतीने उभ्या राहतात आणि गाणे म्हणतात.

" वरसे दनेरी कोट दवाळी याडी तोंन मेरा!  
वरसे दनेरी कोट दवाळी बापू तोंन मेरा!  
दादा, दादी, भाई, भेन तोंन मेरा।।"

असे गाणे गात मुली मेरा मागतात. त्या निमित्त्याने तांड्यातील मुली कोणाच्या आहेत, काय करत आहेत याची ओळख नायकाला आणि अन्य व्यक्तींना होते. अगदी गावातील गरीबाच्या घरी देखील हा कळप जातो. आपल्या कुवतीप्रमाणे गावातील मंडळी या मुलींना ओवाळणी देतात. यावरून असे लक्षात येते की, बंजारा समाज हा कष्ट करणारा आहे आणि कष्ट करून दुसऱ्याना देण्याची वृत्ती आहे.

वरील गाण्यातील वाक्यातील 'कोट' या शब्दाचा अर्थ किल्ला. 'मेरा' चा अर्थ वाडा, 'तोंन' चा अर्थ तुला होतो. याचा अर्थ 'वर्षातून एक दिवस दिवाळी येते. या सणाच्या दिवसी कोणीही हताश राहू नका आणि सगळ्यांना किल्ला व वाडा बांधून देण्याचे अभिवचन देतात.' हे अभिवचन पशुलाही देतात. गाणे म्हणत सगळ्यांना प्रोत्साहित करतात. मेरा मांगुन झाल्यानंतर नायक सर्व मुलींना पैसे देतो, म्हणजे मेरा देतो.

संपूर्ण तांडा कुमारीकांना लक्ष्मी मानतो. अशा प्रमाणेच मुली सगळ्यांच्या घरी दिवे घेवून जातात. एका घरातल्या सगळ्या लोकांना मेरा मागून झाल्यानंतर त्यांच्या घरातील सगळ्या गाई गुरांना मेरा मागायला जास्त वेळ लागत नाही. पण जर तांडा मोठा असेल तर मग मुलींना कधी-कधी रात्रीची दिवस निघून जातो. मुली थकून जातात.

दिवाळीच्या पहिल्या दिवशी तांड्यातील सर्व मुली नायकाच्या असतात किंवा कारभारीच्या असतात किंवा डावच्या असतात,किंवा आसामीच्या असतात. अशा प्रतिष्ठित मंडळीच्या सर्व मुली या दिवशी पारंपरिक पेहरावाचे दर्शन घडते. बंजारा समाजात दिवाळीचे हे दोन दिवस अगदी उत्सव म्हणून उत्साहाने साजरे केले जातात. दिवाळीच्या पहिल्या दिवशी अश्विन महिन्याची आमावस्या येते. या अश्विन आमावस्येला 'काळीमावस' असे म्हणतात.

**"काई रात अंधेरी ये दिवलो बाळलीजो**

**काई लकडीरो तोटो ये चाकला चिरलिजो**

**काई पाणीरो तोटो ये झारी भरलीजो"**

या गाण्यातून बंजारा मुली सांगतात की, काळोखाची रात्र आहे. आपल्यावर संकटे ओढा वली आहेत, तरीही कुणी हताश बसू नका. निसर्गाने आपल्याला भरभरून दिले आहे. कुठल्याही गोष्टीची कमतरता नाही. बंजारा समाज हा निसर्गपूजक आहे. दऱ्याखोऱ्यात राहून पशुंच्या साहाय्याने उदरनिर्वाह करणारा हा समाज पशूंना कसा विसरेल ?

दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी मुली सकाळी अंघोळ करून एकत्र जमतात आणि नायकाच्या घरी येतात आणि या सगळ्या मुली जंगलात जाऊन रानफुले शोधतात आणि जमा करतात. मोठ्या मुलींना तर 'उपवास' असतो. मग मुली घरून सोबत नारळ नेतात. आणि काही फराळाचे सोबत नेतात. मग फुल शोधण्याच्या आधी मुली तिथे नारळ फोडतात, फटाके फोडतात. त्यांच्या सोबत तर लहान-लहान मुले जातात. हे झाल्यावर मुली 'ग्रुप' ने रानफुले शोधतात. सूर्यफुलासारखे फुल, इकडी, तिकाडी, बरु, कल्डू हे रान फुले तोडतात आणि गाणे म्हणतात.

**"बरु रे बरु, पहिले रेतोतो पडीतेम|**

**आब आयोरे बरु तू गोदनेम||"**

**"काई पाणी पडरो ये याडी बाई दर्याती |**

**मारो किसना भिंजारो ये |**

**याडी बाई दर्याती ||"**

**मारे किसनारी लोवडी ये बाई |**

**सो ये सव्वासेरी ||**

**काई पांळी पडरो ये याडी बाई दर्याती |**

**मारी राधिका भिंजारीये ||**

**याडी बाई दर्याती ||**

**मारे राधिकारी ओढणी ये |**

**सो ये सव्वासेरी ||"**

**"डपडा वजाये वाळो कोर छी क पोरीया |**

**वासुदेव-देवकी रो छ ये पोरीया ||"**

असे गाणे म्हणून फुल तोडतात. या गाण्यातून समाजाच्या, घराण्याच्या प्रतिष्ठेचे गुणगान करतात.

फुल तोडल्यानंतर त्या सगळ्या जवळचे फुल जमा करतात आणि परत येतात.

" वीरा रे दामळी ती छूटीये बाळदा
ये डुंगरेरो हालसो मोर "

रानफुल घेवून परतल्यावर सगळ्या मुलींना नायकाची बायको पाणी प्यायला देते. मग मुली 'गोधन' करतात. ('गोधन म्हणजे गाईच्या शेणाचे वर्तुळ बनवून त्याला पूजतात.) त्या मुली नायकाच्या घरी गोधन करतात, घरासमोर एक गोधन करतात आणि त्या गोधनमध्ये जंगलातून आणलेल्या बरुचे गवत, तिकडीचे गवत, लांबडीचे गवत, फुल, इत्यादी फुले ठेवतात. मुली त्या शेणाच्या वर्तुळाला
लावणाऱ्या सजावटीसाठी मुली सकाळी १०.०० च्या दरम्यान जंगलात जातात. दहाच्या नंतर मग त्यांना गोधन करण्यातच सगळा दिवस निघून जातो.

गोधन करून झाल्यानंतर सगळ्या मुली नायकाच्या घरी परत येतात आणि मग नायकाची बायको त्यांना गोधण पूजण्यासाठी गव्हाच्या पिठाच बनवलेल 'कुंलर' देते आणि एक रुपया, हळद, कुंकू, अगरबत्ती घेवून मुली रानफुल त्या गोदणात ठेवून गाणे म्हणत गोधनाची पुजा करतात. गाईच्या शेणाची श्रद्धेने पूजा करतात आणि दिवाळीला सर्वांना सुखी ठेवण्याचे साकडे घालतात. प्रार्थना करताना खालील गीत म्हणतात.

**"फुल रे फुल गाई गोदन फुला
खेवडया, मेवडया, बांड्या, बुच्च्या
घोडेरी कटारे, लांबी हारे धोळी हारे
धोळी भरी गावडी तो लोवडी भरो छाज
फुडाभरो घी मोठेसे मातेर,
लांबेसे कानेर आण, दान देकेस दवाळी मावली
बेटार टागरुज करेस"**

याचा अर्थ 'हे दिवाळी माते, आमच्याकडे जे पशुधन आहे. (गाई, म्हशी, घोडे, बैल) या सगळ्यांना व आम्हालाही सुखी ठेव. आमची भरभराट होऊ दे.'

हे सगळ झाल्यानंतर मग मुली मंदिरावर जातात आणि तेथील लिंबाच्या झाडाला पूजतात आणि ज्या मुलींच लग्न होणार आहे. त्या मुली त्या लिंबाच्या झाडाला हातातील एक बांगडी झाला बांधतात आणि एक रुपया किवा ५० पैसे त्या झाडाच्या खोड्यात ठोकतात आणि गाणे म्हणतात आणि रडतात. कारण त्यांना दुःख होते की त्या पुढच्या दिवाळीला राहणार नाही आणि हे सर्व झाल्यानंतर शेवटी तांड्यातल्या सर्व कुमारीकांना नायकाच्या (तांडा प्रमुख) घरी गोड जेवण असते. दिवाळीच्या दिवशी या सगळ्या कुमारीकांना लक्ष्मी समजून त्यांची पुजा केली जाते. नायक मिष्टान्नाचे भोजन देतो. अशा रीतीने बंजारा समाजात दिवाळी साजरी केल्या जाते.

'दिवाळी' या सणाला बंजारा संस्कृतीमध्ये अन्यसाधारण महत्त्व आहे. ही दिवाळी बंजारा मुलींची दिवाळी म्हणून ओळखली जाते. साधारणतः शेकडो वर्षापूर्वी पासूनच्या परंपरेप्रमाणेच अजूनही हा सण बंजारा समाजामध्ये साजरा केला जातो. तांड्यातील मुलींचा जगाशी फारसा संबंध नसतो. त्यामुळे या मुली जास्त कुणाच्या घरीदारी जात नाहीत. मात्र दिवाळीचे दोन दिवस सगळ्या मुली बाहेर पडून हा सण अगदी उत्साहाने साजरा करतात.

ज्या मुलीं मागच्या दिवाळीला कुमारीका होत्या आणि या दिवाळीला नाही. कारण त्याच लग्न झालेल असते तर त्या मुली दिवाळीच्या दुसऱ्या दिवशीच पाहुण्या येतात आणि त्या मुलींसोबत गप्पा मारतात. त्यानाही आनंद होतो. त्यांना सासरी घ्यायला जातात आणि घेवून येतात. त्या पाहुण्या आल्यानंतर चार-पाच दिवस राहतात आणि मग चालल्या जातात.

शेवटी मग संध्याकाळी मुली परत एकत्र येतात आणि गाणे म्हणतात आणि नाचतात. ते गाणे खालीलप्रमाणे -

"काळो वावर छ ये खेचडीरो झाड छ।
वोरे हेट बापू सुतोच ये आज ॥
उठ रे बापू हात मुंडो धोल ।
मुठीको चुरमो खालरे तु ॥

"काळो वावर छ ये खेचडीरो झाड छ।
वोरे हेट बापू सुतोच ये आज ॥
उठ रे बापू हात मुंडो धोल ।
मुठीको चुरमो खालरे तु ॥

पुढच्या वर्षी नसणाऱ्या मुली यावर्षी गाणे म्हणतात ते खालीलप्रमाणे -

"सातंळो ये सातंळो घांव घाली आवजो
आंगेरे साल तम चली आव जो
सातळोये आजेरो दिवाळो रे तरी जो"

"लांबडी ये लांबडी वराडू तारी चांबडी आगेरीया जरा डीगेरीया"

"तरस लागी ये नायकल झारीच को भुक लागी ये नायकळ पोळीच पो"तिसऱ्या दिवशी भाऊबीज असते. भाऊबीज मात्र हिंदू चालीरितीप्रमाणेच साजरी केली जाते. भाऊबीज हा बहिण-भावाचा दिवस असतो. बहिण भावाला ओवाळते आणि भेट म्हणून बहीण भावाला नारळ आणि रुमाल देते आणि मग भाऊबीजला सगळ्या मुली भावाच्या घरी पाहुण्या येतात. या वेळी स्वतःच्या हाताने शिवलेले आणि सजावट केलेले पारंपारिक ड्रेस भेटवस्तू म्हणून दिली जाते.

लक्ष्मीपुजांच्या दिवशी त्या घरच्या लक्ष्मी असतात म्हणून त्या दुसऱ्या दिवशी आणि भाऊबीजला पाहुण्या येतात. भाऊ बहिणीला घ्यायला जातो. दोन-तीन दिवस राहून त्या परत जायला लागतात. तेव्हा त्यांना नवीन कपडे घेवून वाटी लावतात हिंदू धर्मात ही परंपराच आहे तसेच बंजारा समाजात सुध्दा मुलींना हवे तसे कपडे घेवून देतात.

दिवाळी या सणाला आमच्या बंजारा संस्कृतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही दिवाळी बंजारा समाजातील मुलींची दिवाळी म्हणून ओळखली जाते. साधारणतः शेकडो वर्षापूर्वीपासूनच्या परंपरेप्रमाणेच अजूनही हा सण बंजारा समाजामध्ये साजरा केला जातो. तांड्यातील मुलींचा जगाशी फारसा संबंध नसतो. केवळ त्यांचा निसर्गाशी संबंध असतो. त्यामुळे या मुली जास्त कुणाच्या घरीदारी जात नाहीत. मात्र दिवाळीचे दोन दिवस सगळ्या मुली बाहेर पडून हा सण अगदी उत्साहाने साजरा करतात.

कु.रोशनी जानकीराम राठोड
बी.ए. भाग - १

**माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात.
एक म्हणजे वाचलेली पुस्तक
आणी दुसरी भेटलेली माणसं**



## Reading Camus's The Plague in Time of Covid-19

Albert Camus shot into literary prominence with the publication of The stranger, the philosophical novel in 1942. One of the greatest philosophers, authors and the journalists of French literature outside of the metropolitan brethren, Albert Camus since his childhood had experienced the hardships of life. Just after he was born in 1913, he lost his father and shifted with his mother, maternal grandmother and a paralyzed uncle to the small apartments in Algeria. The spark of genius in Camus was heralded by his school teacher, Louis Germain whom he paid his loyalty as a disciple by dedicating his speech at the time of receiving the Nobel Prize for literature in 1947. Albert Camus is noted as the youngest recipient of this prestigious, international award for literature. Germain had inspired him to learn and helped him to success in school scholarship exams in 1923 which was the first achievement of his life. His literary career began in with the publication of collection of essays, L'envers et l' endroit (wrong side and the right side) in 1937 which deals with his family history and his second collection of essays titled 'Noces' (Nuptials) came out in 1938 through which he dealt with the nauture in country side.

Albert Camus' philosophical work came out in France where he was arrived to get cured from his second stroke of illness of tuberculosis. It is telling that, "taking room in a farmhouse of Le Panelier, a small village in the mountains of Massif Central in France, where he was forced to arrive to seek cure from the tuberculosis he completed his first cycle of absurdist." (Robert, 2020) Here, in isolation in 1942, Camus has worked on his most discussed, trend setting novel The Stranger and his philosophical essay, The Myth of Sysiphus. His philosophical views depicted in these classics created sensation among the scholars. He viewed life from the absurdist point of view. His novel The stranger and subsequent writing is grounded on his theory of absurdity propounded through the myth of Sysiphus. Camus believes that the man's attempt to find meaning in life worth to live or die are futile. He dismisses all forms of rational analysis. He writes: that universal reason, practical or ethical that determinism, those categories that explain everything are enough to make a decent man laugh. (MS, 21) His main concern in this legendary book relies to relate to sketch the ways of living our lies so as to make them worth living despite there being meaningless.

Today at the backdrop of the current outbreak of the world pandemic caused by the novel coronavirus when all the world is shut inside the door, locked down to break the cycle of spread of contagious viral disease, the time seemed to be stopped at once. It has given a longer time and more space to introspect and to act upon. Naturally the scholarly people turn to the history to find the the counterpart for the present situation with hope to find solutions of the present calamity. Tere is lot of literature on epidemics and pandemic in the world the most striking of them is the book by Albert Camus the Plague which was published in 1947 the year when he was awarded the Nobel prize for literature. Regarding the greatness of the brook the critic Robert Zeretsky noted that the plague is locus classicus to deal with. The origin of the book lies with the reason of human goodness. The event experienced by the Albert camins during his stay at Le Panelier, in 1942 has deep reaching impact as inspiration for this book. In the nearby village called Chambon-sur-Lignon, the head man of the village known as pastor, André Trocmé, had saved the lives of more than 3,000 Jewish refugees during the war. When a Vichy official demanded to know if Trocmé was hiding Jews, the pastor replied: "We do not know what a Jew is. We know only men". Camus never revealed what he knew about Chambon, but it is telling that the village's doctor was named Rioux.

Shubham Yamgawali (B.A.III year)


# महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल - सत्र २०२१-२२

सत्र २०२१-२२ सहमागील वर्ष कोरोना मुळे प्रभावित असलेले वर्ष आहे. कोविड - १९ मुळे समग्र जनजीवन विस्कळीत झाले. त्याचा प्रभाव शैक्षणिक संसाधनावरही आपसूकच पडला, शिक्षण व्यवस्था ब-यापैकी कोलमडून पडली. अशा घटकांना सामोरे जातांना आमच्या महाविद्यालयाने शासनाच्या सर्व नियम व अटीचे पालन करीत, विद्यार्थी केंद्रीत उपक्रम राबविण्याचा कसोसिने प्रयत्न केला. याच काळात महाविद्यालय नॅक ला सामोरे गेले. धावपळ,भयग्रस्त आमच्या महाविद्यालयाने जी कामगीरी केली त्याचे योग्य मुल्यमापन करीत, आम्हाला बी दर्जा प्राप्त झाला. या सोबत महाविद्यलयात विविध विभागाच्या व्दारे विद्यापीठ युवा महोत्सव, आंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धामध्ये उत्कृष्ट कला दर्शन घडिवले. व उपक्रम राबविण्यात आले. रासेयो चे पथक नहेमी प्रमाणे क्रियाशील राहिले.सांस्कृतिक विभागाव्दारे नैक समीतीपुढे उत्कृष्ट कलादर्शन घडविले. वार्षिक व्दारे फराळ वाटप करण्यात आले.

अर्थशास्त्र, राज्यशास्त्र,इतिहास, समाजशास्त्र विभागाने, अभ्यासपूर्वक भेटी घेतल्या व विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. संविधान दिनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच शारिरीक शिक्षण विभागाने विविध क्रीडा स्पर्धात सहभाग नोंदविला. मराठी विभागाव्दारे मराठी राजभाषा दिन, व्याख्यानमाला, राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धा घेण्यात आली. सन २०२०-२१ मध्ये उतीर्ण विद्यार्थ्याचा पदवी विदान समारंभ संस्थापक सचिव मा.बी.पी.पवार सर यांचे उपस्थितीत, प्राचार्य.डॉ.जयंत बोबडे यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला. या सत्रात महाविद्यालयाने विद्यार्थी विकासास्तव सतत सक्रिय राहण्याचा प्रयत्न केला.












# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल (सत्र २०२१-२२)












आमच्या महाविद्यलयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक प्राचार्य डॉ.जयंत बोबडे आणि रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.नेमीचंद एफ चव्हाण यांच्या मार्गदर्शनात कार्यरत असुन अत्यत सक्षमपणे रासेयो पथकव्दारे शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये विविध सामाजिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले केंद्र सरकार महाराष्ट्र शासन आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या निर्देशानुसार वेळोवेळी आलेल्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार ग्रामपातळी व महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात आले. नियमित कार्यक्रमासह सत्र २०२१-२२ मध्ये ग्राम येवता या ठिकाणी वृक्षरोपण आणि कोरोना संदर्भात जनजागृती राबविण्यात आली.शिवाय महाविद्यालयामध्ये मिशन युवा स्वास्थ्य अभियानांतर्गत कोविड लसीचे लसीकरण करण्यात आले. दत्तकग्राम येवता येथे दि. २० मार्च ते २७ मार्च २०२२ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले.

तसेच विद्यार्थी केंद्रित राष्ट्रोपेयोगी आणि समाज उन्नत कारणा-या कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात आमचे रासेयो पथक सदा अग्रेसर होते. शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये कोवीड -१९ जनजागृती कार्यक्रम, मास्क, आर्सेनि गोळ्या, सॅनेटायझरचे वाटप, वृक्षारोपन, आंतरराष्ट्रीय योगा दिन, रासेयो दिन, वाचन प्रेरणा दिन, सविधान जागृती, कर्तव्यबोध दिन यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन, गरिब बेघराना फराळ वाटप, महीला सक्षमीकरण, असे विविध कृतिशील उपक्रम रा.से.यो. पथकाव्दारे राबविण्यात आले.

प्रवाहाच्या विरुध्द दिशेला तेच पोहू शकतात ज्यांचे निर्धार ठाम असतात, ज्यांना कुठलेतरी उद्दिष्ट गाठायचे असते,
ध्येयं नसलेली माणस साबणाच्या फेसा सारखी असतात, काही क्षणापूर्वी दिसातात आणि काही क्षणानंतर नाहीशी होतात.
- महात्मा फुले

# सांस्कृतिक विभाग वार्षिक अहवाल सत्र २०२१-२२

आमच्या महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयंत बोबडे आणि सांस्कृतीक समितीचे प्रा.डॉ.भास्कर पाटील, प्रा.एन.एफ.चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये सं.गा.बा.अमरावती विद्यापीठातर्फे आयोजित युवा महोत्सवामध्ये आमच्या महाविद्यालयातील कलावंत विद्यार्थ्यांनी वादविवाद ,वक्तृत्व,कोलाज,क्विज,क्ले मॉडेलींग, मेहंदी,कार्टुनिंग ,पेन्टींग, रांगोळी, यासारख्या विविध कलाप्रकारात आपल्या कलेचे सादरीकरण केले. शिवाय महाविद्यालयीन, आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्येही विद्यार्थ्यांनी उत्स्पूर्तपणे सहभाग नोंदविला. तसेच युवा नेतृत्व शिबीर, साहित्य संम्मेलने यातही विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
















# वाणिज्य विभाग वार्षिक अहवाल - सत्र २०२१-२२

स्थानिक सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय अकोला येथील वाणिज्य अभ्यास मंडळा अंतर्गत सत्र २०२१-२२ मध्ये खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन दि.१५/०९/२०२२ ला करण्यात आले. याकरीता प्रमुख अतिथी म्हणुन संस्थापक सचिव श्री.बी.पी.पवार उपस्थित होते. त्यामध्ये वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष गौरव राजु महाल्ले, उपाध्यक्ष-सतीश नरवाडे,सचिव-मयुरी भस्कट, किंजल तिवारी, अजय महाल्ले व इतर सभासद उपस्थित होते. दिनांक १३ ऑगस्ट २०२१ ला पोलीस लॉन सभागृह येथे स्वयरोजगार प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. दिवाळी उत्सवा प्रसंगी अकोला शहरातील निराधार व निराश्रीत लोकाना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.जयंत बोबडे, विभाग प्रमुख डॉ.आनंद चव्हाण डॉ.गजेन्द्र वासनिक उपस्थित होते.दिनांक १६ डिसेबर २०२१ ला बी.कॉम भाग-१ मधील गरजु विद्यार्थ्यांना नोटबुक्स व कॅलक्युलेटरचे वितरण केले. दि.०१/०१/२०२२ ला हिवाळ्यातील थंडीमध्ये कुडकुडणा-या बेघर गरीब गरजूना थंडीच्या दिवसात उब मिळण्याच्या दृष्टीने गरम वुलन ब्लॅकेटचे तसेच वूलन टोप्याचे वाटप करण्यात आले. दि.२० मार्च २०२२ रोजी अकोला शहरातील उन्हाळ्यातील वाढते तापमान लक्षात घेता पक्षांना थंड पाणी मिळावे या करीता पक्षासाठी मातीचे जलपात्र अंबिका नगर व गुरुकूल नगर या भागामध्ये घरोघरी जावुन वितरीत केले.





## DEPARTMENT OF ENGLISH REPORT -2021-22

Following the directives of the college IQAC, the department of English constituted "English Language Association" of the students representatives as a study forum functioning to boost interest towards the study of English language and to enhance the use of language for day to day academic purpose in the meeting of the faculties of this department on dated 14 October 2021. After discussing about the students's level of perceptions, capacity to use and understand the English of both the stream B. A. and B. Com. names were invited and suggestions that occurred were included in the constitute body of this " English Language Association" the name accepted with common consent in this meeting and to be used refer for further actions. Following are the name s of students office bearer with their designation related to their assigned responsibility.

1. Rohini Amarsing Rathod B A. 3 (President)
2. Rupali Chandu Dethe, B A. 3 (Vice President)
3. Rushabh Pradip Ambarka, B A. (Secretory)
4. Sandhya Gajanan Wankhade, B A. 3 (Member)
5. Mayuri Bhaskat B. Com. 2 (Member)
6. R. M Sadanshiv (Convenor)

The above body of students is recognized as "English Language Association" under the department of English of the college and one faculty R. M Sadanshivassigned as convenor.

# मराठी विभाग वार्षिक अहवाल २०२१-२२

महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने सत्र २०२१- २२ यावर्षी विद्यार्थी केंद्रित विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. मराठी भाषा व वाङ्मय अभ्यास मंडळाचे गठण सप्टेंबर २०२१ मध्ये करण्यात आले. दि.२५ ऑक्टोबर २०२१ हा माजी राष्ट्रपती ए. पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली. नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यस्तरीय काव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी महाराष्ट्रातून २०९कविता प्राप्त झाल्यात. अनुक्रमे निवड करून प्रथम क्रमांक अमरावतीच्या कु.अंजली नरेंद्र इंगळे त्यांना प्राप्त झाला.एकूण पाच पारितोषिके या प्रसंगी देण्यात आली. पारितोषिक वितरण समारंभ विख्यात कवी नारायण कुलकर्णी कवठेकर यांच्या हस्ते तर मा. बी.पी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली व प्राचार्य डॉ जयंत बोबडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. जानेवारी महिन्यात विभागाच्यावतीने 'भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त भाषा जागृती कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला. यावेळी इंग्रजी विभागाचे डॉ. रवींद्र सदांशिव यांनी मार्गदर्शन केले. १८ जानेवारी२०२२ रोजी कर्तव्य बोध दिवस विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच आजादी का अमृत महोत्सव निमित्त ग्रंथालय विभाग व मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयीन स्तरावर व्याख्यानमालेचे करण्यात आले.










घासावा शब्द । तासावा शब्द । तोलावा शब्द । बोलण्यापूर्वी ।।
शब्द हेचि कातर । शब्द सुईदोरा । बेतावेत शब्द । शास्त्राधारे ।।
- संत तुकाराम -

# ग्रंथालय विभाग वार्षिक अहवाल - सत्र २०२०-२१

आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथपाल प्रा. अमोल मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात आले.





1) Orientation for students Date-1/08/2019
2) Books Exhibiton Two Days - 12, 12/09/2019
   Guest : Dr. Ashish Raut (......)
3) Essay Competition on 2nd October 2019, (Gandhi Jayanti)
4) Reading inspirational Day and New Arrival books Exhibition Date : 15/10/2019
5) New Arrival Books Exhibition : Date 3/1/2020
6) Educational Visit to Babuji Deshmukh Nagar vachanalaya. Date : 20/02/2020. Barshitakli, Dist. Akola.

# समाजशास्त्र विभाग वार्षिक अहवाल -सत्र २०२०-२१

आमच्या महाविद्यालयामध्ये सत्र २०१९-२० मध्ये समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना प्रा.सौ.तिहीले आणि प्रा.पद्माकर सदांशिव यांच्या सहकार्याने प्राचार्य डॉ.जयंत बोबडे सर यांच्या मार्गदर्शनात कार्यकारीणी गठीत करण्यात आली. समाजशास्त्र विभागातर्फे २०१९-२० मध्ये पि.के.व्ही.येथे भरलेल्या भव्स कृषी प्रदर्शनीला अभ्यासगत भेट देण्यात आली. त्यासोबतच महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमीत्त सामाजिक उद्‌बोधनाचा कार्यक्रम भव्य प्रमाणात साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.जयंत बोबडे सर यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.






## शारीरिक शिक्षण विभाग वार्षिक अहवाल २०२१-२२

विभागाच्या वतीने सदर सत्रात प्रा. डॉ. नितीन देऊळकर यांच्या मार्गदर्शनात विविध क्रीडा स्पर्धात सहभाग घेतला गेला. पावर लिफ्टिंग ३खेळाडू, वेट लिफ्टिंग ४ खेळाडूंनी सहभाग घेतला.डॉ. नितीन देऊळकर यांची वेटलिफ्टिंग, पावर लिफ्टिंग व शरीरसौष्ठव या क्रीडा प्रकारासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून सं. गा. बा. या.विद्यापीठाच्या निवड समितीवर नियुक्ती झाली.





## अर्थशास्त्र विभाग वार्षिक अहवाल - सत्र २०२१-२२



शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रा.डॉ.प्रभाकर आठवले यांच्या मार्गदर्शनात अभ्यास मंडळाचे गठण करुन, कार्यकारीगीची सर्वानुमते निवड करण्यात आली व त्यांच्या माध्यमातून वर्षभर वेगवेगळे अभ्यासपूर्ण कार्यक्रम घेण्यात आले.


विद्यार्थी शिक्षण घेत असतांना तो सामाजिक व आर्थिक जागृत व्हावा व स्वतः आत्मनिर्भर व्हावा या दृष्टीकोनातून २७ डिसेंबरला डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला व कृषी विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनी व चर्चासत्रामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला. सोबतच महाविद्यालमध्ये अर्थशास्त्र विभागाच्या माध्यमातून वेगवेगळया चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

जिंदगी खेलती भी उसी के साथ है,जो खिलाडी बेहतरीन होता है,
दर्द सबके एक से है, मगर हौंसले सबके अलग अलग है,
कोई हताश होकर बिखर जाता है, तो कोई संघर्ष करके निखर जाता है ।।

# राज्यशास्त्र विभाग वार्षिक अहवाल सत्र २०२१-२२

आमच्या महाविद्यालयामध्ये सत्र २०२१-२२ साठी १२-११-२०२१ रोजी राज्यशस्त्र अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे प्रायार्य डॉ.जयंत बोबडे यांची उपस्थिती होती. राज्यशास्त्र अभ्यास मंडळातर्गत २६ नोव्हेंबर या दिवशी संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन करण्यात आले व संविधान दिन साजरा करण्यात आला. राज्यशास्त्र विभाग व समाजशास्त्र विभाग यांच्या अंयुक्त विद्यमाने मानवी हक्क दिवस १० डिसेंबरला साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्ष म्हणून डॉ.जयंत बोबडे उपस्थित होते, तर डॉ.संगीता तिहीले यांनी मानवी हक्क विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी प्रा.राधा मुरुमकार व प्रा.संदीप कु-हाडे यांनी सुध्दा मानवी हक्कांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि.१३ एप्रिल २०२२ ला प्रा.बी.जी.जोगदंड यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. भारतीय संविधान या विषयावर डॉ.जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.बोबडे यांनी भूषवीले विभागच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वागीण उन्नतीसाठी वर्षभरात अनेक कार्यक्रम राबविण्यात आलेत.





## इतिहास विभाग वार्षिक अहवाल सत्र २०२१-२२

आमच्या महाविद्यालयामध्ये सत्र २०२१-२०२२ साठी दि.१०-१०-२०२१ ला इतिहास अभ्यास मंडळाचे गठण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयंत बोबडे यांची उपस्थिती होती. इतिहास अभ्यास मंडळातर्गत १९ फेब्रुवारी २०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपतीच्या पूजन व हारार्पनानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयंत बोबडे यांनी शिवचरित्राबद्दल गौरव व्यक्त केला. यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद हजर होते. दि. १९-५-२०२२ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधीच्या चळवळीवर व्याख्यान सपंन्न झाले. मुख्य व्याख्याता म्हणुन कनिष्ठ महाविद्यालयाच्या सौ.रोशनी गजानन वाकोडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.जयंत बोबडे होते याप्रसंगी महाविद्यालयातील इतिहास विभागातील मनोज सोनोने यांना रा.तु.म.नागपुर विद्यापीठाने आचार्य पदवीप्राप्त झाल्याबद्दल प्राचार्याच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर इतिहास विभागाचे प्राध्यापक योगेश चव्हाण हजर होते.








**Shri.B.P.Pawar (Ex.Principal)**

M.A.Political Sci. M.A.Pub.Adm.,M.A.History, M.A.Sociology, M.A.Economics.,B.Ed.,D.P.Ed.

**-Founder Secretary-**

Shamki Mata Shikshan and Krida Prasarak Mandal Umari (BK) Dist.Washim

# Introduction of Society

Shamki Mata Shikshan and Krida Prasarak Mandal Umari (BK) Dist. Washim is founded in 1980 with the aim to promote education for unprievilaged and Under previlaged sections of society. Sudhakarrao Naik Arts, Science & Umashankar Khetan Commerce Jr. College Akola is established in 1984-85 & Sudhakarrao Naik Arts and Umashankar Khetan Commerce College Akola is established in 1986-87. It is approved by Maharashtra Govt. and affiliated to Sant Gadge Baba Amravati University Amravati.

Along with this College the follwing Institutions are run by the Society.

1) Sudhakar Naik Junior College (Arts, Commerce), Mangrulpir Dist. Washim.
2) Nath Vidhyalaya, Mangrulpir Dist. Washim
3) Late Shri. Vasantrao Naik Public Taluka Granthalaya, Mangrulpir, Dist. Washim
4) Lal Bahadur Shastri Sarwajanik Wachnalaya, Dapura (Kd.) Dist. Washim.
5) Nehru Granthalaya, Manora Dist. Washim.
6) Central Govt. aided project of informal Education centre, Manora, Dist. Washim. (1987-88)
7) Nutan Sarwajanik Wachanalaya, Barshitakli, Dist. Akola.
8) Smt. Sumantai Naik Vimukta Jamati Ashram Shala, Jam (Vasu) Tq. Barshitakli Dist. Akola.
9) Priyadarshini Vidyalaya, Jam (Vasu) Tq. Barshitakli Dist. Akola.
10) Shamki Mata Sarwajanik Wachanalaya, Umari (Bk) Tq. Manora Dist. Washim.
11) Tilak Granthalaya, Shelu Bazar, Tq. Mangrulpir Dist. Washim
12) Shri. Sant Sevadas Maharaj Sarwajanik Wachanalaya, Jam (Vasu) Tq. Barshitakli, Dist. Akola.


Note cam lite
Latitude : 20.68426889°
Longitude : 77.02802165°
Altitude : 226.04126 meters


Note cam lite
Latitude : 20.68431246°
Longitude : 77.02798995°
Altitude : 254.92456 meters
Date : 04/05/22 10:30 am










World Women's Day
Note cam lite
Latitude : 20.68438157°
Longitude : 77.02789256°
Altitude : 203.3241 meters
Date : 08/03/22 10:55 am


युवा महोत्सव २०२१
प्रश्न मंजुषा,
लेखी परिक्षा
आयोजक


आज़ादी का
अमृत महोत्सव




Note cam lite
Latitude : 20.6843122°
Longitude : 77.0279161°
Altitude : 240.4 meters
Date : 21/03/22 07:37 pm






Note cam lite
Latitude : 20.6843122°
Longitude : 77.0279161°
Altitude : 240.4 meters
Date : 24/03/22 09:40 am



